# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर


## शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत ३ लाख ५५ हजार ६१४ पात्र शेतकऱ्यांची दुसरी यादी जाहीर

मुंबई दि.११ (प्रतिनिधी)- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत पात्र लाभार्थी शेतकऱ्यांची आधार प्रमाणीकरणासाठीची दुसरी यादी आज प्रसिद्ध करण्यात आली. या यादीत एकूण ३ लाख ५५ हजार ६१४ शेतकऱ्यांचा समावेश आहे. पात्र शेतकऱ्यांनी यादीतील आपले नाव तपासून आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले आहे. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले की, ही यादी जिल्हानिहाय आणि बँकनिहाय प्रसिद्ध करण्यात आली असून, ती संबंधित बँक शाखा, विकास संस्था तसेच ग्रामपंचायतींमध्येही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पहिल्या यादीतील आधार प्रमाणीकरण पूर्ण केलेल्या १२ लाख ५८ हजार शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यांवर १० हजार ११४ कोटी ९० लाख रुपयांची कर्जमुक्तीची रक्कम जमा करण्यात आली आहे. यामध्ये ७ ऑगस्ट २०२६ रोजी ६ लाख २२ हजार शेतकऱ्यांना ५ हजार २८ कोटी ६० लाख रुपये, तर २४ ऑगस्ट २०२६ रोजी ६ लाख ३६ हजार शेतकऱ्यांना ५ हजार ८६ कोटी ३० लाख रुपये वितरित करण्यात आले आहेत. दुसऱ्या यादीतील शेतकऱ्यांनी ३१ मार्च २०२६ रोजीची कर्ज थकबाकीची रक्कम तपासून नजीकच्या 'आपले सरकार सेवा केंद्रा'मध्ये जाऊन आधार प्रमाणीकरण करावे. आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतर कर्जमुक्तीची रक्कम संबंधित शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यावर जमा करण्यात येणार आहे.


(वर्ष ६५ वे अंक २३०) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शनिवार, दि.१२ सप्टेंबर २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


# गणेशोत्सवात विघ्न येणार नाही, मात्र सरकारने 'विघ्न' बनू नये-मनोज जरांगे

## मुंबईला कुच करण्यासाठी रणनिती ठरवणार; मराठा बांधवांना आज अंतरवालीत येण्याचे आवाहन

जालना दि.११ (प्रतिनिधी)- 'मराठा आरक्षणाच्या हक्कासाठी मुंबईत धडकणाऱ्या एकाही आंदोलकाकडून पवित्र गणेशोत्सवात कसलेही विघ्न येणार नाही. मात्र, छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेणाऱ्या मुख्यमंत्र्यांनी गणेशोत्सवाचा मूळ इतिहास समजून घ्यावा. ल ोकसमूहाने एकत्र येऊन अन्यायाविरोधात आवाज उठवावा म्हणूनच या उत्सवाची परंपरा सुरू झाली होती. त्यामुळे आंदोलक शांततेचे पालन करतील, पण सरकारने स्वतः 'विघ्नाच्या भूमिकेत' येऊ नये,' असा थेट आणि सज्जड इशारा मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला दिला आहे. अंतरवाल ी सराटी येथे शुक्रवारी (दि. ११) त्यांच्या बेमुदत उपोषणाच्या चौदाव्या दिवशी त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना मुंबई आंदोलनाची आणि शनिवारच्या महाबैठकीची रूपरेषा मांडली.

न्यायालयीन प्रक्रियेविषयी कृतज्ञता व्यक्त करताना जरांगे पाटील म्हणाले, 'जेव्हा जेव्हा सत्ताधाऱ्यांकडून गोरगरिबांवर अन्याय होतो किंवा त्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होतो, तेव्हा न्यायदेवता गरिबांच्या बाजूने उभी राहते. आम्ही न्यायालयाचे मनापासून आभारी आहोत. संविधानाने दिलेले मूल भूत लोकशाही अधिकार सोडून आम्ही कसलेही पाऊल उचल णार नाही. मुंबईत पोहोचल्यानंतरही आमचे आंदोल न १०० टक्के शांततेत आणि लोकशाही मार्गानेच होईल. मुंबईतील ऐतिहासिक आझाद मैदानावर आंदोलन करण्याचा आमचा पूर्ण प्रयत्न राहील.'

आंदोलनाच्या परवानगीवर ठाम भूमिका मांडताना त्यांनी राज्य शासनावर ताशेरे ओढले. 'सरकार जर स्वतःला कायद्याचे आणि लोकशाहीचे रक्षणकर्ते मानत असेल, तर नागरिकांचा शांततेत आंदोलन करण्याचा घटनात्मक अधिकार हिरावून घेता येणार नाही. आम्ही रीतसर अर्जाद्वारे परवानगी मागितली आहे. सरकारने सुरक्षेसाठी चार-दोन नियम किंवा अटी घातल्या



तरी त्यांचे तंतोतंत पालन करण्याची आमची तयारी आहे. मात्र, सरकारने परवानगीच नाकारून आडमुठी भूमिका घेतली आणि सर्व नियम पायदळी तुडवले, तर होणाऱ्या परिणामांना जबाबदार कोण?' असा परखड सवाल त्यांनी उपस्थित केला.

जरांगे पाटलांनी आज पत्रकार परिषद घेऊन मराठा बांधवांना उद्या अंतरवालीत येण्याचं आवाहन केलं आहे.

उद्या १२ सप्टेंबर रोजी १२ वाजता महाराष्ट्रातल्या गरजवंत मराठा समाजाच्या लेकराबाळासाठी बैठक आयोजित करण्यात आली आहे. शक्यतो प्रत्यक्ष बैठकीला उपस्थित रहावे, कोणीही हायगाय करू नका. आता अटीतटीचा सामना आहे, घरी बसून टीव्हीवर बैठक पाहण्याचे दिवस नाहीत, असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी राज्यभरातील मराठा बांधवांना अंतरवालीत येण्याचे आवाहन केले आहे. समाजाच्या लेकराची लढाई अंतिम टप्प्यात आलेली आहे, शक्यतो ज्याला ज्याला शक्य आहे त्याने उद्या बैठकीला हजर रहावे, असे आवाहन जरांगे पाटलांनी केले आहे.

ज्यांना येणे शक्य नाही त्यांनी आशीर्वाद द्यायला रस्त्यावर आले तरी खूप झाले. मात्र, ज्यांना येणे शक्य नाही त्यांनीही आपल्या समाजासाठी लेकरासाठी एक दिवस समाजासाठी द्यावा. जो मार्ग जायचा ठरणार आहे, त्या ठिकाणी हातातली कामं टाकून रस्त्यावर येऊन आशीर्वाद देण्यासाठी या. उद्या मुंबईचा मार्ग टाकला जाईल, जिथे मुक्कामी असेल तिथल्या बांधवांनी जेवणाची मुक्कामाची व्यवस्था करावी, असे आवाहन जरांगे पाटलांनी केले आहे.

पाऊस नाही, अडीअडचणी आहेत, त्यामुळे महिलांनी येऊ नका. गाव सांभाळले तरी खूप झाले, आरक्षणाचे आणि शेतीचे पण संकट आहे. सर्व गावकऱ्यांनी वर्गणी करून गाड्या लावायच्या. एका तालुक्यात आपण लाखा पेक्षा कमी नाहीत, सरकारचे नाक दाबल्याशिवाय तोंड उघडणार नाही, असे म्हणत जरांगे पाटलांनी आता मुंबईला जाण्याचा निर्धार केला असून सरकारला थेट इशाराच दिलाय. ज्यादिवशी तारीख ठरेल त्या दिवशी काम सोडून रस्त्यावर या. मुंबईत आम्हाला त्रास झाला तर जागोजाग रस्ते अडवून ठेवा, सणावारचे दिवस आहेत, आपला जाण्याचं त्याच वेळेत ठरणार आहे. मागच्या वेळी परवानगी नाकारली, यावेळी ते नाकारणार नाहीत. परवानगी दिली आणि नाही दिली तरी मुंबईला जाणार असा इशाराच जरांगे पाटलांनी दिला. तसेच, न्याय देवता गोरगरिबांच्या लेकरावर अन्याय करत नाही, असेही त्यांनी म्हटले.

# एमपीएससी सचिवांना संभाजी ब्रिगेडकडून काळे फासले

## पेपरफुटीवरुन विद्यार्थ्यांसह संघटनांचा संताप

मुंबई दि.११ (प्रतिनिधी)- एमपीएससीचे सचिव महेंद्र हरपाळकर यांच्या तोंडाला संभाजी ब्रिगेडने काळं फासल्याची घटना समोर आली आहे. एमपीएससीच्या पेपरफुटीवरुन संभाजी ब्रिगेडने आक्रमक पवित्रा घेतला आहे. नवी मुंबईत ही घटना घडली.

सदर घटनेनंतर एमपीएससीचा अभ्यास करणाऱ्या २५ लाख विद्यार्थ्यांच्या व महाराष्ट्रातील १२ कोटी जनतेच्यावतीने संभाजी ब्रिगेडने या भ्रष्ट व्यवस्थेच्या आणि नालायक सरकारच्या तोंडाला काळं फासलं आहे. महेंद्र हरपाळकरच्या जी थोबाडीत मारली आहे ती या सरकारला जनतेच्यावतीने संभाजी ब्रिगेडने मारलेली थप्पड आहे, अशी प्रतिक्रिया संभाजी ब्रिगेडचे महाराष्ट्राचे प्रवक्ते संतोष शिंदे यांनी दिली. औषधं निरीक्षक पेपर फुटी संदर्भात संभाजी ब्रिगेडने ३ ऑगस्ट रोजी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालया सामोरं आंदोलन केले होते. त्याचवेळी सरकारला आम्ही इशारा दिला होता. मात्र सरकार गेंड्याच्या कातडीचे आहे, त्यांना ज्या भाषेत समजत त्या भाषेत सांगितलं पाहिजे. चे अध्यक्ष व सचिव यांनी तत्काळ राजीनामा दिला नाही तर पुढचा नंबर हा एमपीएससी अध्यक्षांचा असेल यात तिळमात्र शंका नाही, असा इशारा देखील संतोष शिंदे यांनी दिला आहे.

एमपीएससीच्या माध्यमातून अध्यक्ष आणि सचिव आणि त्यांची जी भ्रष्टाचारानं बरबटलेली टीम आहे, त्यांनी तरुणांच्या आयुष्याची राख रांगोळी करण्याचं ठरवलं आहे.तरुण आत्महत्या करत आहेत, त्याची प्रतिक्रिया आहे. प्रश्नपत्रिका फोडली जात आहे, सरकार आंधळं आणि बहिरं आहे, त्याची ही प्रतिक्रिया आहे. महाराष्ट्रात तरुणांकडे दुर्लक्ष केलं जात आहे.

संभाजी ब्रिगेडनं आज केलेली कारवाई झाकी है, अध्यक्ष अभी बाकी है, मुलं मरत आहेत, असं संतोष शिंदे यांनी म्हटलं. आज प्रश्नपत्रिका फुटत असतील, परीक्षा रद्द होत असतील तर किती वर्ष वाट बघायची असं संतोष शिंदे यांनी म्हटलं.

### गृहराज्यमंत्री योगेश कदमांकडून कारवाईचा इशारा

संभाजी ब्रिगेडने एमपीएससीच्या सचिवांना काळे फासल्याची घटना घडली. या घटनेनंतर आता गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी आंदोलकांना इशारा दिला आहे. गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी प्रतिक्रिया देताना संभाजी ब्रिगेडवर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. सचिवांच्या कार्यालयात जाऊन त्यांना काळे फासल्याच्या घटनेवर योगेश कदम यांनी भाष्य केलं. तुम्ही अशा प्रकारचे आंदोलन करून प्रसिद्धी मिळवतात, पण प्रश्न सुटणार नाही. एमपीएससी प्रकरणात जे जे दोषी असतील त्यांच्यावर सरकार कारवाई करणार आहे. आम्ही प्रकरण गांभीर्याने घेतलं आहे. तरीदेखील राज्यात कायदा व सुव्यवस्था अशा आंदोलनामुळे निर्माण झाली त्याची खबरदारी घेतली जाईल, असे गृहराज्यमंत्री योगेश कदम म्हणाले. धाराशिवमध्ये योगेश कदम यांनी पत्रकारांशी बोलताना भूमिका मांडली.

## ब्रिक्स देशांचा एकत्रित जीडीपी जवळपास ४.५ पटीने वाढला-पंतप्रधान मोदी

नवी दिल्ली दि.११ (वृत्तसंस्था)- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी नवी दिल्ली येथे आयोजित 'ब्रिक्स बिझनेस फोरम'ला संबोधित केले. ''जागतिक अर्थव्यवस्थेसाठी सागरी वाहतुक आणि खलाशी यांची सुरक्षा अत्यंत महत्त्वाची आहे. जागतिक व्यापारासाठी सुरक्षित पुरवठा साखळी देखील आवश्यक आहे'', असेही पंतप्रधान मोदी यावेळी म्हणाले.

''ब्रिक्स देश जगातील ५० टक्के लोकसंख्या, जागतिक जीडीपीच्या ४० टक्के आणि जागतिक व्यापाराच्या २५ टक्क्यांहून अधिक भागाचे प्रतिनिधित्व करतात. त्यामुळे ही संघटना जागतिक अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वपूर्ण घटक बनली आहे. ब्रिक्स देशांचा एकत्रित जीडीपी जवळपास ४.५ पटीने वाढला आहे. या तुलनेत जागतिक जीडीपीची वाढ साधारण २.५ पट झालीय. ब्रिक्स देशांची आर्थिक ताकद उर्वरित जगाच्या तुलनेत जवळपास दुप्पट वेगाने वाढली आहे'', असे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी अधोरेखित केले. पंतप्रधान मोदींनी इनोव्हेशन केंद्र म्हणून ब्रिक्स देशांच्या वाढत्या भूमिकेवरही भर दिला. ''तळागाळातील उपक्रमांपासून ते अत्याधुनिक तंत्रज्ञानापर्यंत विविध क्षेत्रांत नवनवीन उपाय समोर येत असल्याचे त्यांनी सांगितले. भारताच्या यजमानपदाखाली पार पडणारा हा मंच आजवरचा सर्वात मोठा 'ब्रिक्स बिझनेस फोरम' असल्याचे मोदींनी सांगितले. ''ब्रिक्सचा वाढता विस्तार आणि आर्थिक ताकद सहकार्याच्या नव्या संधी निर्माण करत आहे'', असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

# मनोज जरांगेंना मुंबईत येण्यापासून रोखू शकत नाही, हायकोर्टाचा निर्णय

मुंबई दि.११ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणाच्या मुद्यावरुन राज्यातील वातावरण चांगलच तापल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांचं गेल्या १४ दिवसापासून अंतरवाली सराटीत आमरण उपोषण सुरु आहे. अद्याप यावर कोणताही तोडगा निघालेला नाही. सगळ्या मागण्या मान्य झाल्याशिवाय माघार घेणार नसल्याची भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी घेतली आहे. तेसच १२ तारखेनंतर मुंबईला जाण्याचा इशारा देखील जरांगे पाटलांनी दिला आहे. अशातच

मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबईतील संभाव्य आंदोलनाविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. आझाद मैदानात आंदोलनाची परवानगी न देण्याची मागणी करण्यात आली होती. यावर मुंबई उच्च न्यायालयानं महत्वपूर्ण निर्णय दिला आहे. मनोज जरांगेंना मुंबईत येण्यापासून रोखू शकत नाही असा निर्णय उच्च न्यायालयानं दिला आहे.

मनोज जरांगे पाटील यांना मुंबईत येण्यापासून मनाई करण्याचे आदेश देण्यास मुंबई उच्च न्यायालयाने नकार दिला आहे. गेल्यावेळी काय झालंय, त्याधर्तीवर यावेळी परवानगी नाकारता येणार नाही असं मुंबई उच्च न्यायालयानं सांगितलं आहे. आंदोलन करणं हा प्रत्येक नागरिकाचा मुलभूत अधिकार, आम्ही त्यात हस्तक्षेप करू शकत नाही असं मुंबई उच्च न्यायालयानं म्हटलं आहे. त्यामुळं आता मुंबईतील आझाद मैदानात आंदोलन करण्याचा मनोज जरांगे पाटील यांचा मार्ग मोकळा झाल्याचं बोललं जात आहे.

मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबईतील संभाव्य आंदोलनाविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. निलेश डहाणूकर आणि राजेश दळवी यांनी याचिका दाखल केली होती. आझाद मैदानात आंदोलनाची परवानगी न देण्याची मागणी याचिकेत करण्यात आली होती. मागील आंदोलनादरम्यान मुंबईच्या परिस्थितीचा याचिकाकर्त्यांकडून हवाला देण्यात आला होता. मागील आंदोलनावेळी संपूर्ण दक्षिण मुंबईचा आंदोलकांनी ताबा घेतल्याचं चित्र होतं, अशी माहिती याचिकाकर्ते निलेश डहाणूकर आणि राजेश दळवी यांनी मुंबई उच्च न्यायालयात दिली होती. गेल्या वर्षी झालेल्या आंदोलनादरम्यान अखेर उच्च न्यायालयाला आझाद मैदान रिकामी करण्याचे आदेश द्यावे लागले होते. दरम्यान, आज मुख्य न्यायमूर्ती महेश त्रिपाठी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. यामध्ये मनोज जरांगे पाटील यांना मुंबईत येण्यापासून मनाई करण्याचे आदेश देण्यास मुंबई उच्च न्यायालयाने नकार दिला आहे. त्यामुळं जरांगे पाटील यांचे पुढील आंदोलन आता मुंबईत होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## लक्ष्मण हाकेंची मनोज जरांगेंसह राज्य सरकारवर सडकून टीका

जालना दि.११ (प्रतिनिधी)- ''एका चौथी नापास माणसाने उपोषणाचे नाटक करत बेकायदेशीर मागण्या केल्या आणि सरकारने त्याच्या दबावाखाली येत ओबीसींचे आरक्षण संपुष्टात आणले आहे. सरकार चौथी पास माणसाच्या मागण्यांवर लगेच जीआर काढतं, हे राज्याचं मोठं दुर्दैव आहे,'' अशा अत्यंत कडक शब्दांत ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी मनोज जरांगे पाटील आणि राज्य सरकारवर घणाघाती टीका केली. वडीगोद्री येथे ओबीसी पदाधिकाऱ्यांच्या महत्त्वपूर्ण बैठकीनंतर ते पत्रकारांशी बोलत होते. यावेळी हाके यांनी ओबीसी आरक्षणाची सद्यस्थिती, राज्य सरकारची भूमिका आणि मनोज जरांगे यांचे आंदोलन यावर सडेतोड उत्तरे दिली.

लक्ष्मण हाके म्हणाले की, ''गेल्या दोन-तीन वर्षांत सरकारने घेतलेल्या निर्णयामुळे आणि मनोज जरांगेंच्या आंदोलनामुळे ओबीसींचे आरक्षण संपुष्टात आले आहे. आम्ही हे पुराव्यानिशी सिद्ध करायला तयार आहोत. शासनाने नुकतेच सुरू केलेले प्रमाणपत्र वाटपाचे शिबिर म्हणजे खिरापत वाटण्याचा प्रकार आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात असे कधीच घडले नव्हते.''

''आम्हाला फक्त मुख्यमंत्र्यांची भेट नकोय, तर मराठा आणि ओबीसी उपसमितीच्या मंत्र्यांच्या उपस्थितीत आमचे आरक्षण कसे संपले, हे आम्ही त्यांना समजावून सांगू. महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, प्रसाद लाड आणि उदय सामंत यांनीही यावेळी उपस्थित राहावे,'' अशी मागणी त्यांनी केली.

# कृत्रिम पावसाचाही विचार करणार!-कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

पुणे दि.११ (प्रतिनिधी)- राज्यात पावसाने ओढ दिल्याने निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीवर राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी मोठी चिंता व्यक्त केली आहे. ''राज्यावर १०० टक्के दुष्काळाचे सावट असून शेतकऱ्यांची पिके जळण्याच्या अवस्थेत आहेत,'' असे सांगत त्यांनी येत्या काही दिवसांत राज्यभर परिस्थितीचा आढावा घेणार असल्याचे स्पष्ट केले.

पुण्यात माध्यमांशी संवाद साधताना कृषिमंत्री म्हणाले, ''जूनमध्ये पाऊस पडला नाही, जुलैमध्ये काही प्रमाणात पडला, पण ऑगस्टमध्ये पावसाने खूप मोठा खंड दिला. पुणे, कोकण आणि ठाणे परिसराचा काही भाग वगळता मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्राचा पूर्व भाग आणि उत्तर महाराष्ट्रात अत्यंत कमी पाऊस झाला आहे. यामुळे शेतकरी मोठ्या अडचणीत असून, शेतकऱ्यांनी जे पेरले होते ते आता जळण्याच्या अवस्थेत आहे. कापूस आणि सोयाबीनचे प्रचंड नुकसान झाले आहे.'' बैलपोळ्याच्या सणावरही याच दुष्काळाचे सावट असल्याचे ते म्हणाले. ''शेतकरी नाराज आहे, पण वर्षभर राबणाऱ्या बैलाची पूजा करणे त्याचे कर्तव्य असल्याने यंदाचा पोळा अत्यंत साधेपणाने साजरा केला जात आहे,'' असेही भरणे यांनी नमूद केले.

रोहित पवार आणि इतर आमदारांनी राज्यात तत्काळ दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना ५० हजार आणि मजुरांना २५ हजार रुपयांची मदत द्यावी, अशी मागणी केली आहे. यावर बोलताना भरणे म्हणाले की, ''ही मागणी चुकीची नाही. सर्व आमदार त्यांच्या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी याबाबत राज्यभरातून अहवाल मागवण्याचे निर्देश दिले आहेत. पुढील ३ ते ४ दिवसांत हा अहवाल प्राप्त झाल्यावर सरकार योग्य तो निर्णय घेईल. मी स्वतः पुढील आठवड्यापासून कमी पाऊस झालेल्या भागांचा दौरा करणार आहे.'' काँग्रेसचे नेते कपिल पाटील यांनी कृत्रिम पावसाची तयारी लवकर करायला हवी होती, अशी टीका केली. त्यावर भरणे म्हणाले, ''मागील वेळी कृत्रिम पावसाचे अनुभव फारसे चांगले आले नव्हते. मात्र, आता नवीन तंत्रज्ञान आले असेल, तर नक्कीच या प्रयोगाचा शासन सकारात्मक विचार करेल.''

## दिशाच्या वडिलांचा जबाब सीबीआयकडे नोंद; दोन दिवसांतच एफआयआर दाखल होणार

मुंबई दि.११ (प्रतिनिधी)- दिवंगत अभिनेता सुशांत सिंग राजपूतची मॅनेजर दिशा सालियन मृत्यूप्रकरणाला वेगळं वळण मिळालं असून मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये आता याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यानुसार, आज दिशा सालियन मृत्यू प्रकरणी दिशाचे वडील सतिश सालियान यांचा जबाब सीबीआयकडून नोंदवण्यात आला आहे. जवळपास चार तासांनंतर सतिश सालियान सीबीआयच्या कार्यालयातून पडले बाहेर असून लवकरच गुन्हा दाखल होईल, अशी माहिती सतिश सालियन याचे वकील निलेश ओझा यांनी माध्यमांशी बोलताना दिली. मुंबई उच्च न्यायालयात सतिश सालिन यांनी याचिका दाखल केली होती, या याचिकेवरील सुनावणीत हायकोर्टाने दिशा सालियानचे वडील सतिश सालियान यांचा जबाब नोंदवून गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. याप्रकरणी, सारे रेकॉर्ड सीबीआयकडे हॅन्डओव्हर करण्याचेही निर्देश देण्यात आले असून मालवणी पोलिसांनी तपासाचे सर्व तपशील सीबीआयला देण्याचे आदेश देखील न्यायालयाने दिल्याची माहिती दिशा सालियनच्या वकिलांनी दिली. आदित्य ठाकरे आणि सरकारी पक्षाचा युक्तिवाद कोर्टाने फेटाळल्यामुळे आता गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये सुरू झाली आहे. दरम्यान, याप्रकरणी उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सीबीआयने उप अधिक्षक पुरण कुमार यांची तपास अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे.

# सरकारकडून ओबीसींची फसवणूक; त्यांना थेट ओपनमध्ये टाकण्याचा डाव

## राज्यपालांच्या भेटीनंतर नाना पटोलेंचा आरोप

मुंबई दि.११ (प्रतिनिधी)- काँग्रेस नेते नाना पटोले यांनी आज राज्यपाल जिष्णुदेव वर्मा यांची राजभवनावर भेट घेतली. या भेटीत राज्यातील विविध महत्त्वाच्या प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. जातनिहाय जनगणना, ओबीसी समाजाचे प्रश्न, पेपरफुटी प्रकरण, विद्यार्थ्यांचे आंदोलन, शेतकऱ्यांची परिस्थिती आणि दुष्काळसदृश स्थिती या मुद्द्यांकडे पटोलेंनी राज्यपालांचे लक्ष वेधले. या भेटीनंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेत पटोले यांनी राज्य आणि केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे.

केंद्रातील मोदी सरकारवर गंभीर आरोप करताना नाना पटोले म्हणाले की, ''देशामध्ये ४,२०० पेक्षा जास्त ओबीसी जाती आहेत. सरकारने आणि स्वतः पंतप्रधान मोदींनी देशात जातनिहाय जनगणना करण्याचे आश्वासन दिले होते, मात्र ते पाळले जात नाहीये. उलट, ओबीसींची मोठी फसवणूक केली जात आहे. जनगणनेसाठी जे ४० प्रश्न तयार करण्यात आले आहेत, त्यातील १० नंबरच्या प्रश्नातून असे स्पष्ट दिसते की, ओबीसींना थेट ओपन (खुल्या वर्गात) कसे टाकता येईल, याचाच सरकारचा मानस आहे.'' हा ओबीसींवर मोठा अन्याय असल्याचे ते म्हणाले. राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीवर बोलताना पटोले यांनी शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या. ''आम्ही शेतकरी वर्गातील लोक आहोत आणि आज राज्यातील शेतकरी अत्यंत चिंतेत आहे. पावसाअभावी पिके वाळून चालली आहेत. अशा गंभीर परिस्थितीत जशी कर्नाटक सरकारने आपल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत दिली आहे, तशीच मदत राज्यातील फडणवीस-शिंदे सरकारनेही इथल्या शेतकऱ्यांना द्यावी,'' अशी आग्रही मागणी त्यांनी केली.

## पुण्यात १२ दिवस दारूबंदीचे आदेश, मुंबई उच्च न्यायालयाने प्रशासनाला फटकारले

पुणे दि.११ (प्रतिनिधी)- यंदाच्या गणेशोत्सवात पुणे जिल्हा ध्वनीप्रदूषण आणि प्रशासनाने घेतलेल्या निर्णयांमुळे विशेष चर्चेत आला आहे. विद्यानंद बापट यांनी महापालिकेत ध्वनीप्रदूषणाच्या मुद्द्यावर आवाज उठवल्यानंतर, पुणेकरांच्या पाठिंब्यामुळे सार्वजनिक ठिकाणी डीजे आणि ध्वनीप्रदूषणास बंदी घालण्यात आली. याच पार्श्वभूमीवर, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी लेझर लाईट आणि डीजेच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाईचे निर्देश दिले. यासोबतच, गणेशोत्सवाच्या काळात कायदा व सुव्यवस्थेचे कारण देत पुणे जिल्ह्यात सलग १२ दिवस दारूबंदी लागू करण्याचा निर्णयही जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला.

जिल्हा प्रशासनाच्या या १२ दिवसांच्या सरसकट दारूबंदीचा वाद थेट मुंबई उच्च न्यायालयात पोहोचला. संपूर्ण राज्यात नाही, तर केवळ पुणे जिल्ह्यातच १२ दिवसांची दारूबंदी का? असा सवाल उपस्थित करत उच्च न्यायालयाने प्रशासनाला चांगलेच फटकारले. पुणे जिल्ह्यात दारूविक्रीवर घालण्यात आलेल्या या सरसकट बंदीवर न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली आणि अशा प्रकारचा निर्णय घेण्यामागील प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले.

# ब्रिक्स शिखर परिषदेपूर्वी पंतप्रधान मोदी आणि पुतिन यांच्यात बैठक; तेल, व्यापार, संरक्षण विषयांवर चर्चा झाल्याची शक्यता

नवी दिल्ली दि.११ (वृत्तसंस्था)- अठरावी 'ब्रिक्स' परिषद यंदा नवी दिल्ली येथे होत आहे. ब्रिक्स परिषदेच्या निमित्ताने रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन आज भारतात दाखल झाले. तर चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंगही लवकरच भारतात येणार आहेत. दिल्लीत १२ आणि १३ सप्टेंबर २०२६ रोजी ब्रिक्स शिखर परिषद पार पडणार आहे. तत्पूर्वी आज पंतप्रधान मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यात महत्त्वाची द्विपक्षीय बैठक होत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन यांच्यात होणाऱ्या द्विपक्षीय बैठकीत भारत आणि रशिया यांच्यातील आर्थिक आणि सामरिक सहकार्य अधिक दृढ करण्याच्या दृष्टीने चर्चा होण्याची शक्यता वर्तवली जाते.

राष्ट्राध्यक्ष पुतिन भारत मंडपम येथे



बैठकीसाठी आल्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी त्यांना प्राचीन तमिळ अभिजात ग्रंथ 'तिरुक्कुरल'चा रशियन अनुवाद भेट दिला.

पंतप्रधान मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यात सुमारे ४५ मिनिटांची द्विपक्षीय बैठक झाली. द इंडियन एक्सप्रेसने दिलेल्या वृत्तानुसार, बैठकीचा तपशील अद्याप जाहीर करण्यात आलेला नाही. परंतु तेल हा या बैठकीचा महत्त्वाचा मुद्दा असण्याची शक्यता वर्तविण्यात आली. रशिया हा भारताच्या सर्वात मोठ्या कच्च्या तेलाच्या पुरवठादारांपैकी एक आहे.

२०३० पर्यंत द्विपक्षीय व्यापार १०० अब्ज डॉलर्सपर्यंत वाढवणे हा चर्चेचा आणखी एक महत्त्वाचा पैलू असण्याची शक्यता आहे. २०२५ या आर्थिक वर्षात दोन्ही देशांमधील व्यापार जवळपास ७० अब्ज डॉलर्स एवढा होता. रशिया-युक्रेन युद्ध आणि अमेरिका-इराण युद्ध यामुळे सध्याच्या काळातील बदलेले जागतिक राजकारण आणि त्यामुळे जागतिक व्यापारावर होणारा परिणाम या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर भारतात होत असलेली ही १८ वी 'ब्रिक्स शिखर परिषद महत्त्वाची मानली जात आहे. या दरम्यान विविध देशांच्या प्रमुखांबरोबर द्विपक्षीय संबंधांसाठी पंतप्रधान मोदी हे चर्चा करण्याची शक्यता आहे.

## पुढील विश्व मराठी साहित्य संमेलन लंडनमध्ये होणार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची युकेमधून घोषणा

लंडन दि.११ (वृत्तसंस्था)- जगभरात विखुरलेल्या मराठी बांधवांना, उद्योजकांना आणि मराठी संस्कृतीला एका वैश्विक व्यासपीठावर आणण्यासाठी पुढील 'विश्व मराठी साहित्य संमेलन' लंडनमध्ये आयोजित करण्यात येईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. लंडन येथील ऐतिहासिक अशा महाराष्ट्र मंडळाने त्यांचा 'ग्लोबल प्राईड ऑफ महाराष्ट्र पुरस्कार देऊन सन्मान केला. यावेळी एकनाथ शिंदे यांनी ही घोषणा केली. सातासमुद्रापलीकडे मराठी माणसाने झेंडा फडकवला आहे, त्यामुळे महाराष्ट्र मंडळाच्या पाठीशी सरकार आणि एकनाथ शिंदे म्हणून मी खंबीरपणे उभा आहे, असा विश्वास शिंदे यांनी व्यक्त केला.

आपल्या भाषणात उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, मराठी माणूस जगाच्या पाठीवर कुठेही गेला, तरी तो आपली माती, भाषा आणि संस्कृती कधीही विसरत नाही. नुकताच मराठी भाषेला केंद्र सरकारकडून 'अभिजात भाषेचा' दर्जा मिळाला आहे. मराठी भाषेचा हा डंका जगभरात गाजवण्यासाठी आणि जागतिक स्तरावर मराठी माणसांना मजबुतपणे जोडण्यासाठी लंडनमध्ये विश्व मराठी साहित्य संमेलन भरवले जाईल तसेच जगभरातील मराठी भाषकांसाठी एक मध्यवर्ती संस्था स्थापन करण्याबाबतही विचार करीत असल्याचे ते म्हणाले.

# चौकटीपलीकडचा शिक्षकी पेशा...

**आधुनिक** युगात शिक्षकांची भूमिका अधिक आव्हानात्मक झाली आहे. सध्याच्या तंत्रबदलत्या युगात शिक्षणाच्या कल्पना बदलत आहे. नवे शैक्षणिक धोरण, ऑनलाईन शिक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता, यंत्रशिक्षक, परदेशी विद्यापीठांचे भारतात झालेले आगमन अशा अनेक बाबींमुळे शिक्षकांना ऑनलाइन शिकवण, इंटरॅक्टिव्ह बोर्ड, शिक्षणासंबंधी मोबाइल ॲप्स आणि वेबसाइट्स यांचा खुबीने वापर करून अध्यापन करावे लागेल.

शिक्षक म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान देणारी व्यक्ती नाही, तर तो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देणारा एक शिल्पकार असतो. आजच्या आधुनिक आणि तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षकांची भूमिका अधिकच आव्हानात्मक आणि महत्त्वाची झाली आहे. विसाव्या शतकात शिक्षणाच्या कल्पना पारंपरिक होत्या. सध्याच्या तंत्र बदलत्या युगात शिक्षणाच्या कल्पना बदलत आहेत. नवे शैक्षणिक धोरण, ऑनलाइन शिक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता, यंत्रशिक्षक (रोबोटिक), परदेशी विद्यापीठांचे भारतात झालेले आगमन अशा अनेक बाबींमुळे शिक्षकांना बदलावे लागणार आहे. ऑनलाइन शिकवण, इंटरॅक्टिव्ह बोर्ड, शिक्षणासंबंधी मोबाइल ॲप्स आणि वेबसाइट्स यांचा वापर वाढला. शिक्षकांना या तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून विद्यार्थ्यांना शिकवण्याचे काम करावे लागेल. पारंपरिक शिक्षणपद्धती आणि नवीन तंत्रज्ञान यांचा मेळ घालणे हे आजच्या शिक्षकांपुढील मोठे आव्हान आहे. म्हणूनच आजच्या युगात शिक्षकांनी कसे असले पाहिजे, याबाबत सविस्तर विचार करणे गरजेचे आहे. दरवर्षी ५ सप्टेंबर हा दिवस आपल्या देशात शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा आणि त्यांच्या योगदानाला सलाम करण्याचा दिवस आहे. ते एक महान शिक्षक, तत्त्वज्ञ आणि भारताचे दुसरे राष्ट्रपती होते. त्यांचे शिक्षणक्षेत्रातील योगदान अतुलनीय आहे. मात्र त्या पलीकडे जाऊन आजघडीला शिक्षकी पेशाचा विचार करणे आवश्यक आहे.

आजचे जग वेगाने बदलत आहे. माहितीचा महासागर इंटरनेटवर उपलब्ध आहे. अशा परिस्थितीत शिक्षकांनी केवळ पाठ्यपुस्तकांवर अवलंबून राहणे पुरेसे नाही. त्यांनी स्वतःला अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. नवीन शोध, वैज्ञानिक प्रगती, सामाजिक आणि आर्थिक बदल याबद्दल त्यांना माहिती असणे गरजेचे आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांनी डिजिटल साक्षर असणे आवश्यक आहे. स्मार्ट बोर्ड, प्रोजेक्टर, ऑनलाइन लर्निंग प्लॅटफफॉर्म आणि शैक्षणिक ॲप्सचा वापर करून शिक्षण अधिक प्रभावी बनवता येते. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता जागतिक घडामोडींची माहिती देणे, विविध विषयांवर ऑनलाइन संशोधन करण्यास प्रोत्साहन देणे हे आधुनिक शिक्षकांचे कर्तव्य आहे. पारंपरिक शिक्षणपद्धतीत शिक्षक हे केवळ ज्ञान देणारे होते, पण आजच्या युगात त्यांची भूमिका ज्ञान सोपे करून सांगणे आणि विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन करणे अशी झाली आहे. इंटरनेटमुळे आज माहिती सहज उपलब्ध असली तरी, त्या माहितीचे योग्य विश्लेषण करणे आणि तिचा योग्य वापर कसा करावा हे शिकवणे महत्त्वाचे आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक विचार करण्याची क्षमता विकसित केली पाहिजे. प्रश्न विचारण्याचे, वाद-विवाद करण्याचे आणि स्वतःची मते योग्य प्रकारे मांडण्याचे स्वातंत्र्य त्यांनी विद्यार्थ्यांना दिले पाहिजे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या आवडीनिवडी आणि क्षमता ओळखून कारकिर्दीचा योग्य पर्याय निवडण्यास मदत केली पाहिजे. प्रत्येक विद्यार्थ्याची शिकण्याची गती आणि पद्धत वेगळी असते. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष देणे आवश्यक आहे.

आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांवर खूप शैक्षणिक आणि सामाजिक दबाव असतो. परीक्षेचा ताण, पालकांच्या अपेक्षा, सामाजिक माध्यमे आणि समवयस्कांकडून मिळणारा दबाव यामुळे अनेक विद्यार्थी मानसिक ताण अनुभवतात. अशा वेळी शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे केवळ शैक्षणिकच नव्हे तर मानसिक आधारस्तंभ म्हणून काम केले पाहिजे. त्यांनी विद्यार्थ्यांशी मोकळेपणाने संवाद साधला पाहिजे, त्यांच्या समस्या ऐकून घेत मानसिक पातळीवर मदत केली पाहिजे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना योग्य प्रकारे प्रोत्साहित करून आत्मविश्वास वाढवला पाहिजे. आधुनिक युगात शिक्षकांनी विद्यार्थ्यांना नैतिक आणि सामाजिक मूल्यांची शिकवण दिली पाहिजे. प्रामाणिकपणा, कठोर परिश्रम, सहकार्य, इतरांचा आदर करणे आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव यासारखी मूल्ये केवळ तोंडी सांगून चालणार नाही, तर शिक्षकांनी स्वतःच्या आचरणातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवली पाहिजे. आजच्या काळात ज्ञान आणि तंत्रज्ञान वेगाने बदलत आहे. त्यामुळे शिक्षकांनी स्वतःला सतत शिकत राहण्यास तयार ठेवले पाहिजे. नवीन शिक्षणपद्धती, अभ्यासक्रम आणि अध्यापनाच्या पद्धती शिकून घेणे आवश्यक आहे. शिक्षक केवळ विद्यार्थ्यांचे शिक्षकच नाही, तर स्वतःही एक विद्यार्थी असतात. नवीन तंत्रज्ञान, शिक्षणपद्धती आणि विद्यार्थ्यांच्या बदलत्या गरजा समजून घेण्यासाठी त्यांनी कार्यशाळा, प्रशिक्षण आणि चर्चासत्रांमध्ये आवर्जून भाग घेतला पाहिजे.

शिक्षण हे केवळ ज्ञान देणारे नाही, तर विद्यार्थ्यांच्या भविष्याला आकार देणारे माध्यम आहे. शिक्षकांचा सकारात्मक दृष्टिकोन विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मकता निर्माण करतो. शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्याच्या क्षमतेवर विश्वास ठेवला पाहिजे. कोणताही विद्यार्थी कमजोर नसतो, फक्त त्याला योग्य मार्गदर्शनाची गरज असते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या लहान यशाचे कौतुक केले पाहिजे. शिक्षण प्रक्रिया केवळ शाळेतच घडत नाही. ती पालक आणि समाजाच्या सहकार्याने पूर्ण होते. आज शिक्षणसंस्थांनीही शिकवण्याची पद्धत बदलून प्रॅक्टिकलवर जास्त भर दिला पाहिजे. गुणांना कमी महत्त्व देऊन मूल्यांकनाला जास्त महत्त्व द्यायला हवे. जागतिकीकरणाचे फायदे हवे असतील, तर आपल्या मुलामुलींना जागतिक पातळीवर वापरल्या जाणाऱ्या भाषा शिकवण्याचे काम युद्धपातळीवर हाती घ्यावे लागेल. जागतिक पातळीवरच्या रोजगारांची चाहूल आपल्याकडील युवकवर्गापर्यंत पोहोचली की ते इंग्लिश, स्पॅनिश, फ्रेंच, जपानी आदी भाषा शिकायला फक्त तयार होतील असे नव्हे, तर उत्सुकही बनतील. यासाठी प्रचंड प्रमाणावर शिक्षक लागतील हे खरे आहे; परंतु नेमक्या याच ठिकाणी आपण इ-शिक्षण, आभासी शाळा (व्हर्च्युअल क्लासरूम) अशा बाबींचा वापर करू शकतो! माहिती तंत्रज्ञान-सक्षमित शिक्षणपद्धतीचा आपल्याला मोठा उपयोग होणार आहे. प्रत्येक विद्यार्थी वेगळा असतो आणि त्याला वेगळ्या पद्धतीने शिकवण्याची गरज असते. शैक्षणिक ज्ञान देण्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या भावनिक विकासाकडेही लक्ष देणे आवश्यक आहे.

कोरोनानंतरच्या 'न्यू नॉर्मल'मध्ये अनेक व्यक्ती डिजिटल तंत्रज्ञान वापरू लागल्या. यात इमेल, सोशल मीडिया, इ व्यापार, ऑनलाइन व्यवहार यांचा समावेश होतो. यामुळे वैयक्तिक आणि व्यावसायिक माहिती अनेक उद्योगांच्या हाती लागली आहे. या माहितीचा अनेक वेळा गैरवापर होताना आढळतो. या बाबतीत प्रचलित कायदे फारसे प्रभावी नाहीत. इथेच नैतिकतेचा मुद्दा महत्त्वाचा आहे. व्यवसायाचा हेतू फक्त लाभ असाच असता कामा नये. हे बाळकडू शालेय शिक्षणपद्धतीत अंतर्भूत केलेच पाहिजे. शिक्षण म्हणजे शाळा-कॉलेज, घोकंपट्टी आणि अखेर पदवी हे आपल्या मनावर आत्तापर्यंत कोरलेले चित्र बदलायला हवे. पाया बळकट करून, प्रात्यक्षिकांवर भर देऊन, कार्यसंस्कृती अवलंबून रोजगारक्षम विद्यार्थी घडवणे हे आजच्या जमान्यात शिक्षकांचे खरे कार्य आहे. त्याचबरोबर मूल्ये, नीतीमत्ता, राष्ट्रप्रेम, सर्वसमावेशकता, संवेदनशिलताही महत्त्वाची आहे. स्वयंशिस्त आणि चांगला नागरिक घडणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

आजच्या युगात शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक, मित्र आणि तत्त्वज्ञ बनले पाहिजे. त्यांनी स्वतःला सतत अद्ययावत ठेवले पाहिजे, तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

# वर्ल्ड लीडरशिप फोरमतर्फे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना 'स्टेट्समनशिप अवॉर्ड'

## महाराष्ट्राला नव्या उंचीवर नेण्यासाठी एक टीम म्हणून काम

लंडन, दि.११ (वृत्तसंस्था) – पर्यावरणाचे भान ठेऊनच नवा महाराष्ट्र घडविण्याचे काम सुरु असून 'ग्रीन कॅपिटल' आणि तंत्रज्ञान घेऊन महाराष्ट्रात गुंतवणूक करा. महाराष्ट्राकडे असलेली मोठी बाजारपेठ, कुशल मनुष्यबळ आणि पायाभूत सुविधांची ताकद यांची सांगड घालून आपण पर्यावरणपूरक विकासाची नवी भागीदारी उभारूया, असे आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

वर्ल्ड लीडरशिप फोरमच्या वतीने लंडन येथे संसदेच्या हाउस ऑफ कॉमन्समध्ये आयोजित महाराष्ट्र-भारत-यूके डायलॉग या आंतरराष्ट्रीय परिषदेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना आज 'स्टेट्समनशिप अवॉर्ड' देण्यात आले. महाराष्ट्राच्या विकासासाठी केलेले नेतृत्व, सार्वजनिक सेवेतील योगदान आणि राज्याच्या प्रगतीसाठी केलेल्या कार्याची दखल घेऊन हा सन्मान देण्यात आला. याप्रसंगी उपमुख्यमंत्री बोलत होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आपण महाराष्ट्राला नव्या उंचीवर नेण्यासाठी एक टीम म्हणून काम करत असल्याचेही त्यांनी सांगितले. महाराष्ट्राचा एफडीआयमधील वाटा आणखी वाढवण्याचे उद्दिष्ट असल्याचे नमूद करत त्यांनी ब्रिटिश उद्योगपती आणि गुंतवणूकदारांना महाराष्ट्रात गुंतवणुकीचे खुले निमंत्रण दिले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना बॅरोनीस गीता नारगुंड ,लॉर्ड रेमिरेंजर, लॉर्ड रवेल, यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या परिषदेत ब्रिटनच्या संसदेतील खासदार, राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील नेते, विविध उद्योग व व्यावसायिक संस्थांचे प्रतिनिधी, उद्योजक, गुंतवणूकदार, व्यावसायिक तसेच भारतीय आणि ब्रिटिश समुदायातील मान्यवर सहभागी झाले.

ब्रिटनमधील विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींचीही या परिषदेला उपस्थिती होती. लेबर पार्टी, कन्झर्व्हेटिव्ह पार्टी आणि रिफॉर्म यूकेसह विविध पक्षांशी संबंधित नेते या संवादात सहभागी झाले. त्यामुळे महाराष्ट्र आणि ब्रिटनमधील संबंध अधिक व्यापक आणि सर्वसमावेशक पद्धतीने मजबूत करण्याची भूमिका या परिषदेत दिसून आली. आपल्या भाषणाची सुरुवात मराठीत करीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्र आणि ब्रिटनमधील संबंध हे केवळ सरकार आणि व्यापारापुरते मर्यादित नसल्याचे सांगितले. भारतीय वंशाचे नागरिक, विद्यार्थी, उद्योग क्षेत्र आणि लोकांमधील संबंधांमुळे दोन्ही देशांमध्ये एक मजबूत पूल निर्माण झाला आहे, असे ते म्हणाले.





**हरित भांडवल, तंत्रज्ञान घेऊन महाराष्ट्रात पर्यावरणपूरक विकासाच्या नव्या भागीदारीसाठी येण्याचे उपमुख्यमंत्र्यांचे ब्रिटीश उद्योजकांना आवाहन**

### प्रधानमंत्री मोदींमुळे भारताची आर्थिक ताकद वाढली

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने जागतिक अर्थव्यवस्थेत आपले स्थान अधिक मजबूत केले आहे. मोदी यांनी देशासमोरील मोठ्या आर्थिक आव्हानांचे संधीमध्ये रूपांतर केले. त्यांच्या दूरदृष्टीच्या आणि गतिमान नेतृत्वामुळे भारत आज जागतिक स्तरावर एक महत्त्वाची शक्ती म्हणून पुढे येत आहे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. सुमारे दशकापूर्वी भारताचा समावेश जगातील 'फ्रॅजाइल फाइव्ह' म्हणजेच कमकुवत अर्थव्यवस्थांच्या गटात केला जात होता. आज भारत जगातील पाच मोठ्या अर्थव्यवस्थांमध्ये आहे. पायाभूत सुविधांचा विकास, डिजिटल सार्वजनिक सेवा, कर सुधारणा आणि गरजू नागरिकांना थेट मदत यामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेला नवी दिशा मिळाली आहे असे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी नमूद केले.

'आत्मनिर्भर भारत', 'मेक इन इंडिया', 'स्किल इंडिया', 'स्टार्टअप इंडिया' आणि 'डिजिटल इंडिया' या उपक्रमांच्या माध्यमातून भारताच्या विकासाला स्पष्ट दिशा देण्यात आली आहे. ऑपरेशन सिंदूरनंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांच्यावर मध्यपूर्वेतील देशांच्या भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व करण्याची जबाबदारी सोपवली. सध्या ते लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये ग्लोबल एमबीएचे शिक्षण घेत आहेत अशी माहितीही यावेळी उपमुख्यमंत्र्यांनी दिली.

**महाराष्ट्राची अर्थव्यवस्था वेगाने**

महाराष्ट्र हा देशाच्या विकासाचा प्रमुख इंजिन असल्याचे सांगताना उपमुख्यमंत्री शिंदे यांनी राज्याच्या अर्थव्यवस्थेची आकडेवारी मांडली. देशाच्या जीडीपी आणि निर्यातीत महाराष्ट्राचा मोठा वाटा असून महाराष्ट्राला दक्षिण आशियाची तंत्रज्ञानाची राजधानी बनवण्याच्या दिशेने प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.

**ब्रिटन-महाराष्ट्र व्यापाराला नवी दिशा** – भारत आणि ब्रिटनमधील मुक्त व्यापार करारामुळे दोन्ही देशांमधील व्यापार आणि गुंतवणुकीला मोठी संधी निर्माण झाली असून लंडनमध्ये डिझाइन करा आणि महाराष्ट्रात उत्पादन करा, अशी नवी भागीदारी उभी करण्याचे आवाहन त्यांनी ब्रिटिश उद्योगविश्वाला केले.

**महाराष्ट्रात मोठ्या पायाभूत सुविधा** – हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग, वाढवण बंदर, अटल सेतू, दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉर आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ यांसारख्या प्रकल्पांमुळे महाराष्ट्राच्या विकासाला नवी गती मिळते आहे. या प्रकल्पांमुळे वाहतूक आणि मालवाहतुकीचा खर्च कमी होण्यास मदत होईल. मुंबईसह राज्यातील विविध भागांना देश-विदेशातील बाजारपेठांशी अधिक वेगाने जोडण्याचे काम सुरू असल्याचे ते म्हणाले. नागपूर-गोवा शक्तिपीठ महामार्ग, कोकण एक्स्प्रेस वे आणि कोकण किनारी मार्गासारख्या प्रकल्पांमुळे राज्यातील विविध विकास केंद्रे एकमेकांशी जोडली जातील. यामुळे पर्यटन, उद्योग आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**धारावी, ठाणे पुनर्विकास** – शहरी विकास म्हणजे केवळ रस्ते आणि इमारती उभारणे नव्हे, तर लोकांचे जीवनमान सुधारणे होय, असे स्पष्ट करून उपमुख्यमंत्री शिंदे यांनी धारावी पुनर्विकास प्रकल्प, ठाणे क्लस्टर पुनर्विकास, मुंबईतील जुन्या चाळींचा पुनर्विकास ही उदाहरणे सांगितली.

**विकासासोबत पर्यावरणाचे संरक्षण** + मुंबईने दक्षिण आशियातील पहिले स्वतंत्र नेट-झिरो क्लायमेट ॲक्शन प्लॅन सुरू केले असल्याचे त्यांनी नमूद केले. २०३० पर्यंत राज्याच्या वीज गरजेपैकी ५० टक्के गरज स्वच्छ ऊर्जेतून पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले. मुंबईत दररोज मोठ्या प्रमाणात सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा औद्योगिक वापर केला जात आहे. सह्याद्री पर्वतरांगांमध्ये प्रस्तावित न्यू महाबळेश्वर प्रकल्पात मोठा भाग संरक्षित हिरव्या क्षेत्रासाठी ठेवण्यात येणार असून पर्यावरणपूरक पर्यटन आणि स्थानिक रोजगाराला चालना देण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

**'एमओयू म्हणजे केवळ घोषणा नाही'**– गुंतवणूकदारांसाठी महाराष्ट्रात निर्णय प्रक्रियेला वेग देण्यात येत असल्याचे सांगताना उपमुख्यमंत्र्यांनी राज्याच्या वॉर रूमचा उल्लेख केला. सुमारे ५० महत्त्वाच्या प्रकल्पांवर नियमित देखरेख केली जात असल्याचे त्यांनी सांगितले. दावोस येथे झालेल्या सामंजस्य करारांपैकी जवळपास ७५ टक्के करार प्रत्यक्ष प्रकल्पांमध्ये रूपांतरित होत असल्याचे ते म्हणाले.

**ब्रिटिश कंपन्यांसाठी मोठ्या संधी** – इलेक्ट्रिक वाहन, बॅटरी तंत्रज्ञान, हरित हायड्रोजन, नवीकरणीय ऊर्जा, फिनटेक, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात ब्रिटिश कंपन्यांसाठी महाराष्ट्रात मोठ्या संधी आहे. नवी मुंबई विमानतळ परिसरात एज्यु-सिटी, मेडि-सिटी, एरो-सिटी, स्पोर्ट्स सिटी आणि फिनटेक हब यांसारख्या प्रकल्पांना चालना दिली जात आहे. ब्रिटनमधील नामांकित विद्यापीठांनी महाराष्ट्रात शैक्षणिक केंद्रे सुरू करून संयुक्त अभ्यासक्रम आणि संशोधनाला चालना द्यावी, असे आवाहनही त्यांनी केले. ब्रिटिश कंपन्यांनी पुण्यात संशोधन आणि डिझाइन, मुंबईत वित्तीय व्यवस्था, छत्रपती संभाजीनगरमध्ये उत्पादन आणि वाढवण बंदरातून निर्यात अशा संपूर्ण मूल्य साखळीचा लाभ घ्यावा, असे त्यांनी सांगितले. महाराष्ट्राकडे स्केल, स्पीड आणि सस्टेनेबिलिटी आहे. ब्रिटनने आपले तंत्रज्ञान, डिझाइन आणि हरित भांडवल महाराष्ट्रात आणावे असेही ते म्हणाले. वर्ल्ड लीडरशिप फोरमचे संस्थापक नचिकेत जोशी यांनी पण आपले विचार मांडले.

**जगभरातील मराठी उद्योजकांना एकत्र आणण्यासाठी अपेक्स बॉडी उभारणार**

महाराष्ट्राच्या विकासाची क्षमता, गुंतवणुकीच्या संधी आणि जगभरातील मराठी उद्योजकांची ताकद या तीनही बाबींचा संगम घडवून आणण्याची गरज असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लंडनमध्ये गुंतवणूकदारांशी बोलताना काल केले. महाराष्ट्राच्या विकासासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत समन्वयाने काम होत असल्याचा संदेश त्यांनी गुंतवणूकदारांसमोर ठेवला. महाराष्ट्रात गुंतवणूक करण्यासाठी जगभरातील उद्योगसमूहांनी पुढे यावे, असे आवाहन करतानाच जगभरातील मराठी माणसांची वज्रमुठ व्हावी असा मनोदयही त्यांनी व्यक्त केला.

**सीमा प्रश्नावर ठाम** – महाराष्ट्र आणि कर्नाटक यांच्यातील सीमावादाचाही संदर्भ यावेळी चर्चेत आला. बेळगावसह सीमाभागातील मराठी भाषिकांच्या प्रश्नाशी महाराष्ट्राची भूमिका जोडलेली असून हा विषय केवळ राजकीय नसून मराठी अस्मितेशी संबंधित असल्याची भूमिका महाराष्ट्रातील सरकारने सातत्याने मांडली आहे असे सांगून उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नावर मराठी भाषिकांच्या हक्कांच्या बाजूने महाराष्ट्र सरकार ठाम आहे आणि याबाबतीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याशीही चर्चा करणार आहोत

**सरकारमध्ये समन्वय** –मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे एक कर्तबगार मुख्यमंत्री असून राज्याच्या विकासासाठी त्यांच्याशी संपूर्ण समन्वय ठेवून आम्ही काम करत आहोत असे सांगून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, महाराष्ट्राला पुढील काळात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी सरकारचा भर पायाभूत सुविधा, उद्योग, तंत्रज्ञान आणि रोजगारनिर्मितीवर आहे.

**थेट निर्णय** – 'नो रिझन ओन्ली डिसिजन' म्हणजेच उगाचच कारणं न दाखवता जागीच निर्णय घेण्याची आपली कामाची पद्धत असून त्यामुळे प्रशासनाला वेग आला असल्याचेही उपमुख्यमंत्री म्हणाले

**मराठी उद्योजकांना एकत्र आणणार** – जगाच्या कानाकोपऱ्यात मराठी माणूस उद्योग, व्यवसाय, तंत्रज्ञान आणि विविध क्षेत्रांत काम करत आहे. या सगळ्या शक्तीची एकत्रित ताकद महाराष्ट्राच्या विकासासाठी वापरली पाहिजे. जगभरातील मराठी माणसांची 'वज्रमूठ' बांधण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज व्यक्त करताना यासाठी एक व्यापक अपेक्स बॉडी उभारण्याच्या दिशेने काम करण्याचे संकेत त्यांनी दिले. याबाबत उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याशी चर्चा करून पुढाकार घेण्यास सांगणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## पोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्यावर सकाळपर्यंत चार सलाईनद्वारे उपचार

जालना दि.११ (प्रतिनिधी)- मराठा समाजाच्या विविध मागण्यांसाठी अंतरवाली सराटी येथे उपोषणाला बसलेले श्री. मनोज जरांगे पाटील यांना काल गुरुवारपासून आज शुक्रवार सकाळपर्यंत चार सलाईनद्वारे उपचार करण्यात असून सकाळपासून त्यांच्या प्रकृतीला आराम पडला असल्याची माहिती जिल्हा आरोग्य यंत्रणेकडून देण्यात आली.

श्री. जरांगे पाटील यांच्या प्रकृतीवर जिल्हा आरोग्य यंत्रणेकडून सातत्याने लक्ष ठेवण्यात येत आहे. काल सकाळपासून रात्रीपर्यंत त्यांना तीन सलाईन देण्यात आली. काल रात्री ११.३० वाजता श्री. जरांगे यांनी तीव्र डोकेदुखी आणि मळमळ होत असल्याची तक्रार केली. संयुक्त वैद्यकीय पथकाने तत्काळ तपासणी करून त्यांना औषधे दिली. त्यानंतर देखभालीचा भाग म्हणून पहाटे साडेचारपर्यंत आणखी एक सलाईनद्वारे आयव्ही फ्ल्यूड देण्यात आले. सध्या श्री. जरांगे पाटील यांना कोणतीही तक्रार नसल्याची माहिती जिल्हा आरोग्य यंत्रणेने दिली आहे. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, जिल्हा रुग्णालयातील फिजिशियन आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील वरिष्ठ निवासी डॉक्टर उपस्थित होते.

# ब्रिजवाडी मनपा शाळेची पाहणी नवीन शाळा बांधण्यात येणार; विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी पर्यायी व्यवस्था

छत्रपती संभाजीनगर दि.११ (प्रतिनिधी)- मनपा प्राथमिक विद्यालय, ब्रिजवाडी येथे काल शाळेच्या मागील बाजूचे प्लास्टर पडल्याने एका विद्यार्थिनीला किरकोळ दुखापत झाल्याची घटना घडली. घटनेनंतर शिक्षकांनी तत्काळ विद्यार्थिनीला दवाखान्यात नेऊन प्रथमोपचार करून घेतले. त्यानंतर पालकांना माहिती देऊन विद्यार्थिनीला त्यांच्या स्वाधीन करण्यात आले.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर मां. आयुक्त अमोल येडगे यांच्या आदेशानुसार मनपाचे अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, उपायुक्त अंकुश पांढरे, शहर अभियंता संजय कोंबडे, शिक्षणाधिकारी भारत तीनगोटे आणि प्रशासन अधिकारी संजीव सोनार यांनी आज ब्रिजवाडी येथील शाळेला प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. यावेळी शाळेतील काही वर्गखोल्या मोडकळीस आलेल्या असल्याचे निदर्शनास आले.



विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेऊन मोडकळीस आलेल्या वर्गखोल्यांमध्ये विद्यार्थ्यांना न बसविता सुरक्षित ठिकाणी वर्ग भरविण्याच्या सूचना अधिकाऱ्यांनी शिक्षकांना दिल्या. तसेच ब्रिजवाडी येथे नवीन शाळा बांधण्याच्या प्रस्तावाचा नियोजनात समावेश करून लवकरच कार्यवाही करण्याचे आश्वासन अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील यांनी दिले.

यावेळी उपस्थित पालकांनी ब्रिजवाडी येथे विद्यार्थ्यांसाठी नवीन शाळा बांधून देण्याची मागणी केली. ही मागणी अतिरिक्त आयुक्तांनी मान्य केली. दरम्यान, शाळेतील सुस्थितीत असलेल्या वर्गखोल्यांमध्ये बालवाडी, इयत्ता पहिली व दुसरीचे वर्ग दुपारच्या सत्रात, तर उर्वरित वर्ग सकाळच्या सत्रात भरविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये आणि त्यांची सुरक्षितता अबाधित राहावी, यासाठी ही पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे.

# छत्रपती संभाजीनगर ग्रामीण भागात जमावबंदी व शस्त्रबंदी; दि. १२ ते २६ सप्टेंबरपर्यंत आदेश लागू

छत्रपती संभाजीनगर दि.११ (प्रतिनिधी)- जिल्ह्यात सार्वजनिक शांतता तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी छत्रपती संभाजीनगर ग्रामीण जिल्ह्याच्या हद्दीत दि. १२ सप्टेंबर रोजी रात्री १२.०१ वाजेपासून दि. २६ सप्टेंबर रोजी रात्री १२ वाजेपर्यंत जमावबंदी व शस्त्रबंदी आदेश लागू करण्यात आला आहे. अपर जिल्हादंडाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये हा आदेश जारी केला आहे.

या कालावधीत सार्वजनिक ठिकाणी शस्त्रे, लाठ्या-काठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येतील अशा वस्तू, दाहक अथवा स्फोटक पदार्थ तसेच दगड किंवा अन्य क्षेपणास्त्रे बाळगणे अथवा साठविण्यास मनाई राहील. सार्वजनिक शांतता भंग होईल अशा घोषणा, प्रक्षोभक भाषणे, हावभाव, ध्वनिक्षेपण तसेच आक्षेपार्ह चित्रे, चिन्हे किंवा फलकांचे प्रदर्शन व प्रसार करण्यासही मनाई करण्यात आली आहे.

आदेशानुसार पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींना सार्वजनिक ठिकाणी एकत्र जमणे तसेच निदर्शने, धरणे, मोर्चे व मिरवणुका काढण्यास मनाई राहील. तथापि, कर्तव्यावरील पोलीस व शासकीय कर्मचारी, विवाह, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, यात्रा तसेच सक्षम अधिकाऱ्यांनी विशेष परवानगी दिलेल्या कार्यक्रम व मिरवणुकांना हा आदेश लागू राहणार नाही. आवश्यक परवानगी देण्याचे अधिकार पोलीस अधीक्षक, छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण) यांनी प्राधिकृत केलेल्या पोलीस अधिकाऱ्यांना राहतील.

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिनः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दि.१७ रोजी ध्वजारोहण; तयारीचा पालकमंत्र्यांनी घेतला आढावा




छत्रपती संभाजीनगर, दि. ११ (प्रतिनिधी) – मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या मुख्य शासकीय समारंभात गुरुवार दि. १७ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार आहे. या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा आढावा आज सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय सिरसाट यांनी घेतला.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजीत या बैठकीस विभागीय आयुक्त जी.श्रीकांत, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मनपा आयुक्त अमोल येडगे, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, विभागीय क्रीडा उपसंचालक शेखर पाटील, उपसंचालक(माहिती) प्रवीण टाके, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता एस.एस. भगत ,सहायुक्त मंजुषा मिसकर आदी उपस्थित होते.

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून छत्रपती संभाजीनगर शहरात विविध ठिकाणी विकासकामांचे भूमिपूजन, शुभारंभ आणि लोकार्पण कार्यक्रमांचे नियोजन विविध विभाग करीत आहेत. यामध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, महानगरपालिका, विभागीय क्रीडा संकुलातील विविध विकासकामांचा समावेश आहे. याशिवाय शहराच्या अन्य भागांतही कार्यक्रमाचे नियोजन आहे, याबाबत माहिती देण्यात आली.

मुख्य सोहळ्याच्या अनुषंगाने आवश्यक तयारी, नियोजन, वाहतूक, सुरक्षा व्यवस्था याबाबत पालकमंत्री शिरसाट यांनी सुचना दिल्या. नियोजन सुकर करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वय ठेवावा. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडण्यासाठी सर्व यंत्रणांनी आपापली जबाबदारी समन्वयाने पार पाडावी, असे निर्देश श्री. शिरसाट यांनी दिले.

# ढाब्यावर FDAचा मोठा दणका! 'शेळके मामा'चा अन्न परवाना निलंबित

छत्रपती संभाजीनगर, दि. ११ (प्रतिनिधी) – शहरातील ढाब्यांवरील अन्नपदार्थांच्या गुणवत्तेसह स्वच्छतेबाबत अन्न व औषध प्रशासनाने धडक कारवाई सुरू केली आहे. या कारवाईदरम्यान 'शेळके मामा' ढाब्यावर गंभीर स्वरूपाच्या त्रुटी आढळून आल्याने त्याचा अन्न परवाना निलंबित करण्यात आला आहे. ढाब्यावरील अस्वच्छता, झुरळांचा प्रादुर्भाव तसेच शाकाहारी आणि मांसाहारी पदार्थांची योग्य पद्धतीने हाताळणी न केल्याचे प्रकार आढळल्याने प्रशासनाने हा कठोर निर्णय घेतला.


अन्नपदार्थ तयार करण्याच्या ठिकाणी स्वच्छता राखणे, अन्नसाठवणूक योग्य पद्धतीने करणे तसेच शाकाहारी आणि मांसाहारी पदार्थांसाठी स्वतंत्र व्यवस्था ठेवणे बंधनकारक आहे. मात्र तपासणीदरम्यान या नियमांचे पालन होत नसल्याचे निदर्शनास आले. स्वयंपाकघर आणि अन्न तयार करण्याच्या परिसरात अस्वच्छता आढळून आली. तसेच झुरळांचा प्रादुर्भाव असल्याचेही तपासणीत समोर आले.

विशेष म्हणजे, व्हेज आणि नॉनव्हेज पदार्थांची हाताळणी करताना आवश्यक खबरदारी घेतली जात नसल्याचे आढळून आले. त्यामुळे ग्राहकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन FDAने कारवाईचा बडगा उगारला.

ग्राहकांच्या आरोग्याशी तडजोड खपवून घेतली जाणार नाही. ढाबे, हॉटेल आणि खाद्यपदार्थ विक्री केंद्रांमध्ये स्वच्छता आणि अन्नसुरक्षेच्या नियमांचे काटेकोर पालन होणे आवश्यक आहे. ग्राहकांना सुरक्षित आणि दर्जेदार अन्न मिळावे, यासाठी प्रशासनाकडून वेळोवेळी तपासण्या केल्या जातात. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर परवाना निलंबनासह नियमानुसार कारवाई केली जाऊ शकते.

'शेळके मामा' ढाब्यावरील कारवाईमुळे शहरातील इतर हॉटेल व ढाबा चालकांमध्येही खळबळ उडाली असून, अन्नसुरक्षा नियमांचे पालन न करणाऱ्यांविरोधात FDA आणखी कठोर कारवाई करणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ : नवभारत का शंखनाद' या पुस्तकाचे नवी दिल्लीत भव्य लोकार्पण




## संघाचा इतिहास, वर्तमान आणि २०४७च्या भारताचे स्वप्न मांडणाऱ्या पुस्तकाला मान्यवरांकडून विशेष दाद

नवी दिल्ली, दि. ९ (वृत्तसंस्था) – छत्रपती संभाजीनगर स्थित लेखक व स्वयंसेवक पंकज विनोद फुलवाणी लिखित 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ : नवभारत का शंखनाद' या पुस्तकाचा भव्य लोकार्पण सोहळा दि. ९ सप्टेंबर रोजी नवी दिल्ली येथील प्रतिष्ठित इंडिया इंटरनॅशनल सेंटर (आय आय सी) येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

या पुस्तकात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा इतिहास, वर्तमानातील कार्य, संघविचार, हिंदुत्व, एकात्म मानवदर्शन, सेवा, संस्कार, सामाजिक समरसता, संघटन, युवा, शिक्षण, कुटुंब प्रबोधन तसेच २०२५ ते २०४७ या अमृतकालातील विकसित भारताच्या निर्मितीतील समाजाची भूमिका यांचा व्यापक आढावा घेण्यात आला आहे.

या लोकार्पण सोहळ्यास मा. श्री. जे. नंदकुमारजी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच युवा फाऊंडेशन चे संस्थापक श्री. शंतनु गुप्ता जी, गरुडा प्रकाशन चे सी ई ओ श्री. संक्रांत सानू जी आणि ज्येष्ठ लेखक व प्राध्यापक प्रा. डॉ. ओंकार नाथजी यांची विशेष उपस्थिती होती.

मा. जे. नंदकुमार जी यांनी पुस्तकाचे विशेष कौतुक करताना संघाचा इतिहास, वर्तमान आणि २०४७ कडे पाहणारे भविष्य अत्यंत सुटसुटीत व सुंदर पद्धतीने मांडल्याचे नमूद केले. विशेषतः प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी देण्यात आलेले ५ ऍक्शन पॉइंट्स त्यांना विशेष आवडले. संघविचार, हिंदुत्व आणि भविष्यातील भारत यांचा परस्परसंबंध पुस्तकात प्रभावीपणे मांडल्याचे त्यांनी सांगितले.

श्री. संक्रांत सानू जी यांनी पुस्तकाच्या लेखनशैलीचे आणि मांडणीचे विशेष कौतुक केले. कोणत्याही वयोगटातील वाचकाला सहज वाचता व समजता येईल, अशा पद्धतीने पुस्तक लिहिले असल्याचे त्यांनी नमूद केले. हे पुस्तक भारतातील प्रत्येक शाखेत वाचले जावे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

श्री. शंतनु गुप्ता जी यांनी पुस्तकाची थीम, व्हिजन आणि २०२५-२०४७ या अमृतकालाच्या संकल्पनेचे विशेष कौतुक केले. संघाचा इतिहास केवळ मांडण्यापेक्षा वर्तमानातील सामाजिक आव्हाने आणि विकसित भारताच्या निर्मितीशी त्याची सांगड घालण्याचा प्रयत्न पुस्तकात करण्यात आल्याचे त्यांनी अधोरेखित केले. प्रा. डॉ. ओंकार नाथ जी यांनी पुस्तकातील प्रत्येक प्रकरणातील सखोल अभ्यास, विषयांची निवड आणि मांडणीचे कौतुक केले. विशेषतः हिंदुत्व आणि एकात्म मानवदर्शन या विषयाची पुस्तकात करण्यात आलेली मांडणी त्यांना विशेष भावली. नव्या पिढीला, विशेषतः जेन झी ला संघविचार, हिंदुत्व, राष्ट्रचिंतन आणि भारतीय संस्कृती समजून घेण्यासाठी पुस्तक उपयुक्त ठरेल, असे मत त्यांनी व्यक्त केले.

### पहिल्याच पुस्तकाला देशभरातून प्रतिसाद

'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ : नवभारत का शंखनाद' या पुस्तकाला प्रकाशनानंतर अल्पावधीतच वाचकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून आतापर्यंत सुमारे ६०० प्रतींची विक्री झाली आहे. विशेष म्हणजे काश्मीरपासून बंगालपर्यंत देशाच्या विविध भागांतील वाचकांपर्यंत हे पुस्तक पोहोचले आहे.

एका नवोदित लेखकाच्या पहिल्याच पुस्तकाला मिळणारा हा प्रतिसाद लेखक पंकज विनोद फुलवाणी यांच्यासाठी विशेष प्रेरणादायी ठरला आहे. यावेळी बोलताना लेखक श्री पंकज विनोद फुलवाणी म्हणाले, मी स्वतः ला मोठा लेखक किंवा विचारवंत मानत नाही. शाखेतून संस्कार घेतलेल्या एका सामान्य स्वयंसेवकाने समाजात जे पाहिले, अनुभवले आणि जाणवले, त्याला शब्द देण्याचा हा प्रामाणिक प्रयत्न आहे. माझ्यासाठी या पुस्तकाचे लोकार्पण हा शेवट नसून एका नव्या प्रवासाची सुरुवात आहे.

ते पुढे म्हणाले, हे पुस्तक केवळ माझ्यापुरते मर्यादित न राहता प्रत्येक स्वयंसेवकापर्यंत, जिज्ञासू वाचकापर्यंत आणि विशेषतः नव्या पिढीपर्यंत पोहोचावे, ही माझी मनापासून इच्छा आहे.

एका पुस्तकातून विचार जागृत व्हावेत, विचारातून व्यक्ती घडावी, व्यक्तीतून समाज घडावा आणि समाजातून राष्ट्रनिर्माण व्हावे, हाच या लेखनामागील उद्देश आहे. 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ : नवभारत का शंखनाद' हे पुस्तक गरुडा प्रकाशनतर्फे प्रकाशित करण्यात आले असून श्री पंकज विनोद फुलवाणी यांचे हे पहिलेच पुस्तक आहे. लेखक झालो असलो तरी सर्वप्रथम आणि शेवटपर्यंत मी स्वयंसेवकच आहे, या भावनेतून लेखकाने पुस्तकाची निर्मिती केल्याचे त्यांनी सांगितले.

# सध्या प्रकाशित झालेली प्रारूप मतदार यादी ही अंतिम मतदार यादी नाही - मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय

मुंबई, दि. ११ (प्रतिनिधी) – सध्या राज्यात राबवल्या जात असलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेअंतर्गत प्रकाशित झालेल्या प्रारूप मतदार यादीतील मतदारांच्या संख्येबाबत माध्यमांमध्ये आलेल्या काही बातम्यांमध्ये एसआयआर च्या प्रारूप मतदार यादीत २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत दिल्या गेलेल्या एकूण मतांपेक्षा कमी मतदार असल्याचा दावा करण्यात आला आहे. यासंदर्भातील प्रत्यक्ष वस्तुस्थिती खालील प्रमाणे आहे.

विशेष सखोल पुनरीक्षण-२०२६ च्या पहिल्या टप्प्यात मतदार सर्वसाधारण निवासी असल्याबद्दलच्या वस्तुस्थितीची पडताळणी करण्यावर मुख्य भर देण्यात आला होता. म्हणूनच, अर्ज करताना दिलेल्या पत्त्यावर जे लोक प्रत्यक्षात राहत नाहीत, अशा लोकांचा समावेश या प्रारूप यादीत करण्यात आलेला नाही. सध्या सुरू असलेला टप्प्याअंतर्गत जे मतदार (अर्जात दिलेल्या पत्त्यावर) हजर नाहीत किंवा तिथून दुसरीकडे राहायला गेले आहेत, पण राज्याच्या हद्दीतच राहत आहेत, असे मतदार आता त्यांच्या सध्याच्या राहत्या ठिकाणच्या यादीत नाव नोंदवण्यासाठी अर्ज करू शकतात अशी संधी त्याना उपलब्ध आहे.

याचप्रमाणे, मृत मतदारांची नावे यादीतून वगळण्यात आली आहेत. तसेच, १ ऑक्टोबर २०२४ नंतर वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या नवीन मतदारांची नावे नोंदवण्याची प्रक्रिया आता सुरू आहे. याशिवाय, विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेच्या संपूर्ण पहिल्या टप्प्यादरम्यान राहत्या ठिकाणावरून दीर्घकाळ अनुपस्थित असण्यासारख्या वा इतर कारणांमुळे ज्यांची नावे यादीत समाविष्ट झालेली नसतील, ते लोकसुद्धा आता मतदार म्हणून नोंदणीसाठी अर्ज करू शकतात. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, या विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेचा सध्याचा टप्पा हा नवीन नावे नोंदवून घेण्यावरच केंद्रित आहे. याद्वारे एकही पात्र नागरिक मतदार यादीतून सुटणार नाही याची सुनिश्चिती केली जात आहे. ही संपूर्ण मोहीम नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीला पूर्ण होईल. त्यामुळे, सध्याच्या यादीची तुलना आधीच्या आकडेवारीशी करणे (जी संक्षिप्त पुनरीक्षणाच्या अंतिम यादीवर आधारित होती) पूर्णपणे अयोग्य आणि चुकीचे ठरेल.

कोणतीही तुलना किंवा विश्लेषण करायचे असल्यास ते अंतिम यादी प्रसिद्ध झाल्यानंतरच केले जाणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अन्यथा, तोपर्यंत घाईघाईने काढलेल्या निष्कर्षांमुळे गैरसमज पसरण्याचीच शक्यता आहे. म्हणूनच, सर्व संबंधित घटक, प्रसारम ाध्यमांचे प्रतिनिधी आणि नागरिकांना आमची नम्र विनंती आहे की, कोणतीही तुलना किंवा मूल्यमापन करण्यापूर्वी त्यांनी अंतिम यादी अधिकृतपणे प्रसिद्ध होण्याची वाट पाहावी, असे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे.

# फिल्म एज्युकेशन आणि वेल्फेअर फाउंडेशनच्या वतीने, आयोजित जागतिक चित्रपट आंतरराष्ट्रीय महोत्सव पुरस्कार सोहळा उत्साहात संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि. ११ (प्रतिनिधी) – जागतिक चित्रपट कलाविश्वातील विविध भाषांतील आणि देशांतील चित्रपट, लघुपट, माहिती पट, संगीत व्हिडीओ कलाकृतींना व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या WORLD CINEMA INTERNATIONAL FILM FESTIVALचा पहिला पुरस्कार सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात दिमाखात पार पडला.



या पुरस्कार सोहळ्यास प्रमुख पाहुणे अभिनेता संजय बनसोडे, रवींद्र किसनराव बोर्डे, सहाय्यक कक्ष अधिकारी, जलसंपदा विभाग, मंत्रालय मुंबई, कवी गीतकार पाशा खान, सीमा खान, निम र्ता रघुनाथ साळवे, अनिता साळवे, राजू कांबळे, अब्दुल्ला आजलांनी, उमेश निकाळजे आयोजक आयोजक तुषार थोरात, लक्ष्मी थोरात, सुशांत पाटील, सागर जाधव, पोपट थोरात यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

या सोहळ्यात विविध देशांतून सहभागी झालेल्या चित्रपटांचे प्रदर्शन, परीक्षण आणि विविध श्रेणींमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या दिग्दर्शक, निर्माता, सह-निर्माता, पटकथा लेखक, कलाकार, छायाचित्रकार, संगीतकार आणि गायक, संपादक, सहकलाकार आणि इतर तांत्रिक बाबींमध्ये उल्लेखनीय योगदान देणाऱ्या विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. तसेच चित्रपट क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरली.पुरस्कार स्वीकारताना कलाकार आणि विजेत्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

आयोजक तुषार थोरात, यांनी आपले विचारात जागतिक स्तरावरील चित्रपटांना एकत्र आणण्यासोबतच नवोदित कलावंतांना आंतरराष्ट्रीय व्यासपीठ मिळवून देण्याच्या उद्देशाने हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आल्याचे सांगितले तसेच या महोत्सवाच्या पहिल्याच पर्वाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. चित्रपटसृष्टीतील विविध मान्यवरांच्या उपस्थितीमुळे पुरस्कार सोहळ्याला विशेष रंगत आली. कार्यकाचे सूत्रसंचालन महेश माने, गौरी गोजे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी ते साठी सर्व एज्युकेशन अँड वेल पर फाउंडेशन या

# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेच्या प्रस्तावांना तातडीने मंजुरी द्यावी : उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत

नंदुरबार, दि. ११ सप्टेंबर २०२६ (प्रतिनिधी) – जिल्ह्यातील युवक-युवतींना स्वयंरोजगाराच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत (उचएऋझ) प्राप्त प्रस्तावांना संबंधित बँकांनी तातडीने मंजुरी द्यावी, असे निर्देश उद्योग व म राठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत यांनी दिले.

जिल्हा उद्योग विभागाची आढावा बैठक रंगावली सभागृहात संपन्न झाली. यावेळी आमदार चंद्रकांत रघुवंशी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ.अनबलगन पी, अपर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे, निवासी उपजिल्हाधिकारी आशा संघवी नाशिक विभाग उद्योग सह आयुक्त वृषाली सोने, जिल्हा उद्योग केंद्राचे सहायक आयुक्त (उद्योग व सेवा ) निलेश गायकवाड आदी उपस्थित होते.

उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ. सामंत म्हणाले की, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेच्या माध्यमातून स्थानिक युवकांना उद्योग-व्यवसाय सुरू करण्यासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले जाते. त्याम ुळे या योजनेअंतर्गत बँकांकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावांची विनाकारण विलंब न करता तपासणी करून पात्र प्रस्तावांना तातडीने कर्जमंजुरी द्यावी.

यासाठी बॅंकने नाकारलेल्या प्रकरणासाठी विशेष कॅम्पचे आयोजन करावे. या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी दरमहा आढावा घेवून येत्या ६० दिवसाच्या आत कर्ज प्रकरणे मंजुरी करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्यात. यावेळी बँकांचे प्रतिनिधी, तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जात प्रमाणपत्रासाठी परभणी जिल्ह्यात विशेष शिबिरे

## १७ सप्टेंबरपर्यंत ९ तालुक्यांतील विविध गावांत मंडळस्तरावर शिबिरांचे आयोजन

परभणी, दि. ११ (प्रतिनिधी) – कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा पात्र नागरिकांना जात प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करण्यासाठी परभणी जिल्ह्यात १७ सप्टेंबर २०२६ पर्यंत मंडळस्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरांचा लाभ पात्र नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले.

जलसंपदा (गोदावरी-कृष्णा खोरे महामंडळ) मंत्री तथा अध्यक्ष, मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमिती यांच्या निर्दे शानुसार ही कार्यवाही करण्यात येत आहे. कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा पात्र नागरिकांना जात प्रमाणपत्र देण्यासाठी आवश्यक कार्यवाही अधिक गतिमान व्हावी, यासाठी मंडळस्तरावर शिबिरे आयोजित करण्यात आली आहेत. शिबिरांचा तपशील पुढील प्रमाणे आहे

**परभणी तालुका :** टाकळी कु., झरी, पेडगाव, सिंगणापूर, दैठणा, पिंपळी, जांब तसेच परभणी शहर/ग्रामीण येथे दि. ११ सप्टेंबर रोजी शिबिर होणार आहे.

**गंगाखेड तालुका :** महातपुरी - ११ सप्टेंबर, माखणी - १२ सप्टेंबर, पिंपळदरी - १३ सप्टेंबर, राणी सावरगाव - १५ सप्टेंबर.

**पूर्णा तालुका :** पूर्णा, कात्नेश्वर, कावलगाव - ११ सप्टेंबर.

पालम तालुका : पालम (पुयणी), पेठशिवणी (भोगाव) - ११ सप्टेंबर; रावराजूर, तांदुळवाडी - १५ सप्टेंबर.

**सेलू तालुका :** सेलू, वालूर - ११ सप्टेंबर; चिकलठाणा बु., देऊळगाव गा. - १५ सप्टेंबर; कुपटा, मोरगाव - १६ सप्टेंबर.

**जिंतूर तालुका :** दुधगाव, आडगाव खु. - ११ सप्टेंबर; सांगवी मा., बामणी तसेच चारठाणा, वाघी धा. - १५ सप्टेंबर.

**पाथरी तालुका :** बाभळगाव - ११ सप्टेंबर; हादगाव बु. - १५ सप्टेंबर; कासापुरी - १६ सप्टेंबर.

**मानवत तालुका :** मानवत, केकरजवळा - ११ सप्टेंबर; कोल्हा, ताडबोरगाव - १५ सप्टेंबर.

**सोनपेठ तालुका :** आवलगाव (बोदरगाव) - ११ सप्टेंबर; सोनपेठ (थडी पिंपळगाव), वडगाव, शेळगाव (शिरशी बु.) - १५ सप्टेंबर. सदर मंडळाच्या मुख्यालय स्तरावर हे शिबिर होणार आहेत. परभणी जिल्ह्यातील कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा पात्र नागरिकांनी आपल्या गावासाठी निश्चित करण्यात आलेल्या दिनांकानुसार संबंधित शिबिराच्या ठिकाणी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहून जात प्रमाणपत्र मिळिवण्याच्या प्रक्रियेचा लाभ घ्यावा. जात प्रमाणपत्र मिळिवण्यासाठी काही अडचणी किंवा अडथळे निर्माण झाल्यास संबंधित शिबिराच्या नियंत्रण अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. पात्र नागरिकांनी शिबिराच्या तारखेची नोंद घेऊन वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले आहे.

# दिव्यांगांना गणेशोत्सवापूर्वी दोन महिन्यांचा निर्वाह भत्ता

छत्रपती संभाजीनगर, दि. ११ (प्रतिनिधी) – महानगरपालिकेच्या वतीने दिव्यांग नागरिकांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत असून, त्यापैकी उदरनिर्वाह भत्ता योजनेचा लाभ पात्र दिव्यांग लाभार्थ्यांना दिला जात आहे. दिव्यांग कक्षाकडे एकूण ५ हजार २४० दिव्यांग लाभार्थ्यांची नोंद झाली असून, त्यापैकी ४ हजार ८९३ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे.

दिव्यांगांच्या मागणीनुसार शिष्यवृत्तीची रक्कम ही वितरित करण्यात आली आहे. आदेशानुसार ३८७ लाभार्थ्यांच्या खात्यावर शिष्यवृत्तीची रक्कम जमा करण्यात आली आहे. उर्वरित पात्र लाभार्थ्यांनाही गणेशोत्सवापूर्वी दोन महिन्यांचा निर्वाह भत्ता वितरित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे दिव्यांग लाभार्थ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### घरी बसून 'सक्षम ॲप'वर नोंदणीची सुविधा

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी दिव्यांग लाभार्थ्यांना आता घरी बसूनच हयातीची नोंदणी करता येणार आहे. यासाठी 'सक्षम ॲप'च्या माध्यमातून मोबाईलवर फेस स्कॅनिंग करून हयात असल्याची नोंद करता येणार आहे. दर महिन्याच्या ११ ते ३० तारखेच्या कालावधीत लाभार्थ्यांनी ॲपद्वारे हयातीची नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यानंतर पात्र लाभार्थ्यांच्या खात्यावर लाभाची रक्कम वितरित करण्यात येणार आहे.

या सुविधेमुळे दिव्यांग नागरिकांना कार्यालयात प्रत्यक्ष येण्याची गरज कमी होऊन त्यांची गैरसोय दूर होणार आहे. घरबसल्या उपलब्ध करून देण्यात आलेल्या या सुविधेमुळे दिव्यांग लाभार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

### निराधार योजनेतील दिव्यांगांनाही लाभ

संजय गांधी निराधार योजनेचा लाभ घेणाऱ्या पात्र दिव्यांग नागरिकांनाही महानगरपालिकेच्या निर्वाह भत्ता योजनेचा लाभ देण्यात येत आहे. त्यामुळे पात्र दिव्यांगांना शासनाच्या विविध योजनांसोबत महानगरपालिकेच्या योजनेचाही आधार मिळत आहे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, पूकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# विकसित मराठवाड्यासाठी विभागांनी ठोस कृती आराखडा द्यावा-जी.श्रीकांत

## 'विकसित मराठवाड्या'साठी विभागनिहाय विकासकामांचा आढावा

छत्रपती संभाजीनगर दि.११ (प्रतिनिधी)- 'विकसित महाराष्ट्र २०३०' अंतर्गत 'विकसित मराठवाडा' ही संकल्पना प्रभावीपणे राबविण्यासाठी सर्व विभागप्रमुखांनी आपल्या विभागातील पूर्ण झालेली, सुरू असलेली व प्रलंबित कामांची अद्ययावत माहिती संक्षिप्त स्वरूपात सादर करावी. चांगली कामे, रखडलेले प्रकल्प व त्यावरील उपाययोजना यांची स्पष्ट माहिती द्यावी. निधी आवश्यक असलेले व निधीची आवश्यकता नसलेले प्रस्ताव स्वतंत्रपणे नमूद करावेत, अशा सूचना विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिल्या.

'विकसित महाराष्ट्र २०३०' अंतर्गत 'विकसित मराठवाडा' ही संकल्पना राबविण्याबाबतच्या कार्यवाहीच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जीएसटीचे सह आयुक्त अभिजित राऊत, महावितरणचे सह व्यवस्थापकीय संचालक गजेंद्र बावने, अपर विभागीय आयुक्त रिता मेत्रेवार, सह आयुक्त मंजुषा मिसकर तसेच विविध शासकीय विभागांचे विभाग प्रमुख उपस्थित होते. या बैठकीत मराठवाड्यातील विविध विभागांच्या सुरू असलेल्या, पूर्ण झालेल्या व प्रलंबित कामांचा आढावा घेण्यात आला.

जी.श्रीकांत म्हणाले, प्रकल्पांच्या अंमलबजावणीत होणारा विलंब टाळण्यासाठी विभागांमध्ये प्रभावी समन्वय ठेवावा. एखाद्या प्रकल्पासाठी जमीन आवश्यक असल्यास त्याची स्पष्ट माहिती द्यावी. प्रलंबित बाबींचे निराकरण करण्यासाठी संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने कार्यवाही करावी, असे जी. श्रीकांत यांनी सांगितले.

मराठवाड्याच्या विकासासाठी तयार करण्यात येणाऱ्या प्रस्तावांची सांगड महाराष्ट्राला एक ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनविण्याच्या उद्दिष्टाशी घालावी. विभागांनी केवळ निधीची मागणी करणारे प्रस्ताव न देता विकासाला चालना देणारे, परिणामकारक व दीर्घकालीन लाभ देणारे प्रस्ताव तयार करावेत. उपलब्ध साधनसंपत्तीचा प्रभावी वापर करून विकासाची गती वाढवावी, असे त्यांनी सांगितले.

१७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत विविध प्रमाणपत्रांचे वाटप, सेवा शिबिरे व नागरिकांना थेट लाभ देणारे उपक्रम राबवावेत. नागरिकांना शासकीय सेवा अधिक सुलभ, गतिमान व दर्जेदार पद्धतीने उपलब्ध करून देण्यावर भर द्यावा. तरुण कर्मचाऱ्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांचा प्रशासनाच्या कामकाजात उपयोग करावा, असेही जी. श्रीकांत यांनी सांगितले.



शिपाई व कोतवालापासून वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांच्या कल्पनांना समान महत्त्व द्यावे. कनिष्ठ कर्मचाऱ्यांनी मांडलेल्या चांगल्या सूचनांकडे दुर्लक्ष करू नये. 'सेवा संकल्प अभियाना'अंतर्गत आयोजित करण्यात येणाऱ्या 'मंथन शिबिरात' कर्मचाऱ्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांवर चर्चा करण्यात येईल. उपयुक्त कल्पना इतर विभागांमध्येही राबविण्याचा प्रयत्न करावा, असे त्यांनी स्पष्ट केले.

स्पर्धा परीक्षांच्या पद्धतीत आवश्यक सुधारणा करण्यासाठी नवीन कर्मचाऱ्यांकडून सूचना मागवाव्यात. अभ्यासक्रम, परीक्षा पद्धती व कार्यपद्धतीतील अडचणींबाबतच्या सूचना लेखी स्वरूपात किंवा ई-मेलद्वारे सादर कराव्यात. या सूचनांची प्राथमिक छाननी करून त्या २१ सप्टेंबर रोजी भेट देणाऱ्या समितीसमोर मांडाव्यात. कार्यालयाबाहेर येणाऱ्या शिष्टमंडळे व आंदोलकांकडूनही विधायक सूचना घेऊन त्यांचा विचार करावा, असे त्यांनी सांगितले.

मराठवाड्यात पावसाचा खंड पडल्याने संभाव्य दुष्काळी परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून आवश्यक उपाययोजना कराव्यात. विशेषतः लातूर, धाराशिव, परभणी, जालना व बीड जिल्ह्यांमध्ये परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवावे व शासनाच्या दुष्काळ निवारणाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. शासकीय कार्यालयांमध्ये स्वच्छता व प्रशासकीय शिस्तीला प्राधान्य द्यावे. प्रत्येक सोमवारी कामाच्या सुरुवातीचा एक तास श्रमदानातून कार्यालय स्वच्छ ठेवावे. कार्यालयात गुटखा खाऊन थुंकण्यास पूर्णपणे प्रतिबंध करावा व स्वच्छतागृहांची नियमित स्वच्छता सुनिश्चित करावी. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबरदरम्यान कार्यालयांची अचानक तपासणी केली जाईल. अस्वच्छता आढळल्यास संबंधित कार्यालय प्रमुखावर पाच हजार रुपयांचा दंड आकारण्यात येईल, असे जी. श्रीकांत यांनी स्पष्ट केले.

# सेवा संकल्प अभियान;जास्तीतजास्त नागरिकांपर्यंत योजनांचे लाभ पोहोचवा- जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.



छत्रपती संभाजीनगर दि.११ (प्रतिनिधी)- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संविधानिक पदावरील कारकीर्दीस २५ वर्षे झाल्यानिमित्त दि.१७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोंबर याकालावधीत सेवा संकल्प अभियान राबविण्यात येणार आहे. याअभियानाद्वारे जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत लोककल्याणाच्या योजनांचे लाभ पोहोचवा,असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी आज दिले.

सेवा संकल्प अभियानात राबवावयाच्या विविध उपक्रमांचे नियोजन करण्यासाठी आज जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक आयोजीत करण्यात आली. जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. अध्यक्षस्थानी होते. निवासी उपजिल्हाधिकारी जनार्धन विधाते, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, जिल्हा नियोजन अधिकारी ममता हटकर, जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने, कार्यकारी अभियंता जलसंधारण नरेंद्र कटके, उच्च शिक्षण सहसंचालक आर. एम. गव्हाणे, कौशल्य विकास विभागाचे सुरेश बहुरे तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.सर्व क्षेत्रीय अधिकारी दुरदृष्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते. सेवा संकल्प अभियानात शासनाच्या विविध सेवा आणि योजनांचा लाभ नागरिकांना उपलब्ध करून द्यावयाचा आहे. त्यासाठी प्रत्येक विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या सेवाप्रदानाचे नियोजन संबंधित विभागाने करावे. तालुकास्तरावर शिबिरांचे आयोजन करून नागरिकांची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यास प्राधान्य द्यावे. सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे,असे निर्देश जिल्हाधिकारी गौडा यांनी दिले. यासंदर्भात दि.९ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून त्यात सविस्तर माहिती देण्यात आली आहे,असेही त्यांनी सांगितले.निवासी उपजिल्हाधिकारी जनार्धन विधाते यांनी 'सेवा संकल्प अभियान' विषयक सविस्तर माहिती देणारे सादरीकरण केले. त्यानुसार, या अभियानात १३ प्रकारचे विविध उपक्रम राबवावयाचे असून त्याद्वारे नागरिकांना विविध सेवा विविध विभागांमार्फत दिल्या जाणार आहेत. त्यात महसूल विभागामार्फत सेवासेतू अभियान, कौशल्य रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागामार्फत इनोव्हेशन चॅलेंज, स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत सेवा माझे योगदान,विकसित भारत संकल्प यात्रा, सेवा ज्योत यात्रा, शिक्षण विभागामार्फत विकसीत भारत या विषयावर चित्रकला व वक्तृत्व स्पर्धा, महिला व बालविकास विभागामार्फत अंगणवाडी उत्सव, आशिर्वादाचा दिवा, योजनांच्या यशकथांवर आधारीत बदलाची गोष्ट, सांस्कृतिक कार्य विभागामार्फत आभार आणि संकल्पाची रांगोळी, जन कल्याणकारी योजनांची माहिती देण्यासाठी नमो सेवागाथा, जल,जन आणि सेवा संकल्प यात्रा,जनसेवक महाकुंभ ग्रामविकास विभागामार्फत राबविण्यात येतील,अशी माहिती दिली.

अभियानाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय समिती असून जिल्हाधिकारी हे अध्यक्ष, सर्व मनपा आयुक्त, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सदस्य तर जिल्हा माहिती अधिकारी हे सदस्य सचिव असतील. सेवा संकल्प अभियानाच्या अंमलबजावणीस दि.१७ पासून सुरुवात होत असून त्यादृष्टिने कार्यक्रमांचे आयोजन करावे. अधिकाधिक लोकांपर्यंत सेवा पोहोचवाव्या असे निर्देश जिल्हाधिकारी गौडा यांनी दिले.

# एमपीएससीच्या विद्यार्थ्यांचा पुन्हा एल्गार, अध्यक्षपदी तुकाराम मुंडे यांची नियुक्ती करा-आमदार रोहित पवार



छत्रपती संभाजीनगर दि.११ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कारभाराविरोधात आणि कथित पेपरफुटीच्या निषेधार्थ हजारो विद्यार्थ्यांनी गुरुवारी शहरात आक्रोश मोर्चा काढला. आमखास मैदानापासून सुरू झालेला मोर्चा विभागीय आयुक्त कार्यालयावर धडकला. त्यानंतर दिल्लीगेट येथे मोर्चाचे सभेत रूपांतर झाले. आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी विविध मागण्यांसाठी जोरदार घोषणाबाजी केली.

एमपीएससीच्या अध्यक्षपदी तुकाराम मुंडे यांची नियुक्ती करावी, वर्ग 'क'ची परीक्षा नोव्हेंबरमध्येच घेण्यात यावी, परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घ्यावी, तसेच मुख्यमंत्री यांनी विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घ्याव्यात, अशा प्रमुख मागण्या यावेळी करण्यात आल्या.

यावेळी मार्गदर्शन करताना आमदार रोहित पवार म्हणाले, 'श्इएण्च्या परीक्षा पारदर्शक होण्यासाठी सरकारने समिती नेमली, त्याचे स्वागत आहे. मात्र केवळ समिती किंवा एसआयटी नेमून प्रश्न सुटणार नाही. श्इएण्च्या अध्यक्षपदी तुकाराम मुंढे किंवा व्ही. राधा यांच्यासारख्या सक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी.'

वर्ग 'क'ची परीक्षा जानेवारीमध्ये घेण्याचा निर्णय विद्यार्थ्यांना मान्य नसल्याचे पवार यांनी सांगितले. ते म्हणाले, 'शेतकरी कर्जाचा डोंगर डोक्यावर असतानाही आपल्या मुलांना शिक्षण देत आहेत. पाऊस नसल्याने आणि पिकांचे नुकसान झाल्याने शेतकरी मोठ्या अडचणीत आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांची परीक्षा पुढे ढकलणे अन्यायकारक आहे. सण असले तरी विद्यार्थी परीक्षा देतील. परीक्षा नोव्हेंबरमध्येच घ्यावी.'

एमपीएससीच्या परीक्षेत कथित गैरप्रकार झाल्याचा आरोप करत पवार यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली. केवळ काही जणांवर कारवाई करून किंवा एसआयटी स्थापन करून प्रश्न सुटणार नाही. पैशाच्या जोरावर पेपर खरेदी करून अपात्र व्यक्ती शासकीय सेवेत दाखल झाल्यास प्रशासनातील भ्रष्टाचार आणखी वाढेल, अशी भीती त्यांनी व्यक्त केली.

# स्मार्ट सिटी बसच्या सुरक्षेसाठी १५ दिवसांचे सेफ्टी ड्राईव्ह

## आयुक्त अमोल येडगे यांचे निर्देश; प्रत्येक बसची चेकलिस्टनुसार तपासणी बंधनकारक

छत्रपती संभाजीनगर दि.११ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर शहरातील स्मार्ट सिटी बससेवेतील प्रवाशांची सुरक्षितता तसेच बसची तांत्रिक स्थिती अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने महानगरपालिका आयुक्त श्री. अमोल येडगे यांनी आज जाधवमंडी येथील स्मार्ट सिटी बस डेपोला प्रत्यक्ष भेट देऊन बसची पाहणी केली. यावेळी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची बैठक घेऊन बस सुरक्षेबाबत आवश्यक त्या सूचना दिल्या.

मागील दोन आठवड्यांत रेल्वे स्टेशन परिसरात एका स्मार्ट बसच्या वायरिंगला आग लागून धूर निघण्याची घटना तसेच खुलताबाद घाट परिसरात एका बसचे टायर निखळण्याची घटना घडली होती. या घटनांची गांभीर्याने दखल घेत आयुक्तांनी बसच्या तांत्रिक व यांत्रिक सुरक्षेची काटेकोर तपासणी करण्याचे निर्देश दिले.

यावेळी आयुक्तांनी १५ दिवसांचे विशेष 'सेफ्टी ड्राईव्ह' राबविण्याचे निर्देश दिले. प्रत्येक बस मार्गावर सोडण्यापूर्वी तिची निर्धारित चेकलिस्टनुसार तपासणी करण्यात यावी. बसचे ग्रीसिंग, नट-बोल्ट, टायरची स्थिती, टायरमधील हवेचा दाब तसेच इतर महत्त्वाचे यांत्रिक घटक तपासल्यानंतरच बस मार्गावर सोडण्यात यावी, असे त्यांनी स्पष्ट केले.

बसच्या बॅटरी व वायरिंगची जोडणी, लूज कनेक्शन अथवा अन्य तांत्रिक त्रुटी आहेत का, याची डेपो स्तरावर नियमित तपासणी करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. टायर निखळणे किंवा बसला आग लागणे या घटना प्रवाशांच्या जीवितास धोका निर्माण करणाऱ्या असून अशा घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी सेफ्टी नॉर्म्सची काटेकोर अंमलबजावणी करावी, असे आयुक्तांनी सांगितले.

बस मार्गावर घेऊन जाण्यापूर्वी सर्व सुरक्षा बाबींची तपासणी करण्याची जबाबदारी संबंधित चालकाचीही आहे. चेकलिस्टमधील सर्व बाबींची खात्री केल्याशिवाय चालकाने बस डेपोतून बाहेर काढू नये, असे निर्देश आयुक्तांनी दिले.

इलेक्ट्रिक बस ताफ्यातील ३४ बसेसची तांत्रिक चाचणी व्यवस्थित करण्यात यावी. बस चार्ज करून त्याची चाचणी घेण्यासाठी आवश्यक असलेला कालावधी लक्षात घेता १७ सप्टेंबरपूर्वी प्रत्येक बसची चाचणी पूर्ण करून ठेवावी, असे निर्देश आयुक्तांनी दिले.



तसेच आगामी काळात दाखल होणाऱ्या २७ नवीन पीएम ई-बसेससाठी उपलब्ध चार्जर सुसंगत (कम्पॅटिबल) आहेत का, चार्जिंगची क्षमता व इलेक्ट्रिकल यंत्रणा योग्य आहे का, याची आगाऊ तपासणी करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. बस चालकांची नियुक्ती करताना त्यांच्या बॅच/बिल्ला, वैध ड्रायव्हिंग परवाना, किमान तीन वर्षांचा वाहन चालविण्याचा अनुभव तसेच मेडिकल फिटनेस सर्टिफिकेट यांची काटेकोरपणे पडताळणी करण्यात यावी. प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पात्र व सक्षम चालकांचीच नियुक्ती होईल, याची दक्षता घेण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. बससेवेतील सुरक्षाविषयक कोणतीही त्रुटी दुर्लक्षित न करता प्रवाशांची सुरक्षितता ही सर्वोच्च प्राथमिकता ठेवून प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभावीपणे राबवाव्यात, असे निर्देश आयुक्त श्री. अमोल येडगे यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

# मनपा विद्यार्थ्यांना मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास समजणार

## मुकुंदवाडी व चिकलठाणा शाळेतील १२० विद्यार्थ्यांची संग्रहालयास भेट

छत्रपती संभाजीनगर दि.११ (प्रतिनिधी)- मराठवाडा मुक्ती संग्रामाचा गौरवशाली इतिहास महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून समजावा, या उद्देशाने मनपा आयुक्त अमोल येडगे यांच्या संकल्पनेतून इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी मराठवाडा मुक्ती संग्राम संग्रहालय भेटीचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.



या उपक्रमाच्या प्रारंभी महानगरपालिका माध्यमिक शाळा, मुकुंदवाडी आणि महानगरपालिका माध्यमिक शाळा, चिकलठाणा येथील एकूण १२० विद्यार्थ्यांनी आज मराठवाडा मुक्ती संग्राम संग्रहालयास भेट दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी संग्रहालयातील ऐतिहासिक वस्तू, छायाचित्रे व स्वातंत्र्यलढ्याशी संबंधित माहिती जाणून घेत मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास समजून घेतला.

महानगरपालिकेच्या शाळांमधील इयत्ता नववी व दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांना संग्रहालय भेटीचा लाभ मिळावा, यासाठी दररोज दोन शाळांतील विद्यार्थ्यांचे नियोजन करण्यात आले आहे. हा उपक्रम दि. २४ सप्टेंबर २०२६ पर्यंत सुरू राहणार असून, त्यातून विद्यार्थ्यांमध्ये ऐतिहासिक जाणीव, देशभक्ती आणि स्वातंत्र्यलढ्याबद्दल अभिमानाची भावना निर्माण होण्यास मदत होणार आहे.

या उपक्रमाचे नियोजन उपायुक्त अंकुश पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी ज्ञानदेव सांगळे यांनी केले. यावेळी मुकुंदवाडी शाळेचे मुख्याध्यापक संतोष तपकिरे तसेच शिक्षक विद्यार्थ्यांसमवेत उपस्थित होते.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना; तिसऱ्या यादीत जिल्ह्यातील १९ हजार २४३ पात्र शेतकऱ्यांचा समावेश

छत्रपती संभाजीनगर दि.११ (प्रतिनिधी)- 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' अंतर्गत लाभ मिळण्यासाठी पात्र शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण (ई-केवायसी) तातडीने पूर्ण करणे आवश्यक आहे. योजनेच्या पोर्टलवर आज (दि.११) तिसरी यादी प्रसिद्ध करण्यात आली असून, त्यामध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील १ हजार १०५ गावांमधील १९ हजार २४३ पात्र शेतकऱ्यांचा समावेश आहे. संबंधित शेतकऱ्यांनी जवळच्या 'आपले सरकार सेवा केंद्रा'त जाऊन आधार प्रमाणीकरण पूर्ण करावे, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे. कर्जमुक्ती योजनेअंतर्गत जिल्ह्यातील सर्व बँकांनी १ लाख ९० हजार ७०१ शेतकऱ्यांची माहिती कर्जमाफी पोर्टलवर अपलोड केली आहे. त्यापैकी आतापर्यंत १ लाख २३ हजार १३० शेतकऱ्यांची विशिष्ट क्रमांकासह यादी आधार प्रमाणीकरणासाठी प्रसिद्ध करण्यात आली आहे. आधार प्रमाणीकरण पूर्ण केलेल्या शेतकऱ्यांपैकी ७४ हजार ९४५ शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांमध्ये ५१८ कोटी रुपयांची रक्कम जमा होऊन त्यांची कर्जखाती निरंक करण्यात आली आहेत. आज प्रसिद्ध झालेल्या तिसऱ्या यादीमध्ये जिल्ह्यातील १ हजार १०५ गावांतील एकूण १९ हजार २४३ पात्र शेतकऱ्यांचा समावेश असून, त्यामध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या १ हजार ७७४ शेतकऱ्यांचा समावेश आहे. पात्र शेतकऱ्यांच्या याद्या संबंधित बँक शाखा, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, आपले सरकार सेवा केंद्र, ग्रामपंचायत, तलाठी कार्यालय तसेच सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यालयात प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. लाभार्थी शेतकऱ्यांनी संबंधित यादीमध्ये आपले नाव असल्याची खात्री करावी. त्यानंतर ॲग्रीस्टॅक क्रमांक, मूळ आधारकार्ड आणि बचत खात्याचे पासबुक घेऊन जवळच्या आपले सरकार सेवा केंद्रात प्रत्यक्ष उपस्थित राहून आधार प्रमाणीकरण (ई-केवायसी) तातडीने पूर्ण करावे. योजनेचा लाभ मिळण्यासाठी आधार प्रमाणीकरण पूर्ण करणे अत्यावश्यक व बंधनकारक आहे. यासंदर्भात अधिक माहितीसाठी संबंधित बँक शाखा, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर तसेच संबंधित उप/सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी केले आहे.

# कुणबी जात प्रमाणपत्रासाठी विशेष शिबिरात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात आतापर्यंत ३८९ अर्ज प्राप्त




छत्रपती संभाजीनगर दि.११ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगरात दि. १० व ११ सप्टेंबर २०२६ या कालावधीत झालेल्या २८ विशेष शिबीरात कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र वितरणासाठी जिल्ह्यात मंडळस्तरावर २८ शिबिरे घेण्यात आली. या शिबिरांमध्ये आतापर्यंत एकूण ३८९ अर्ज प्राप्त झाले असल्याची माहिती जिल्हाधिकारी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.यांनी दिली आहे. तालुकानिहाय प्राप्त अर्जांमध्ये उप विभाग छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील शिबिरात ४४, उपविभाग येथे पैठण व फुलंब्रीमधील १४३, उपविभाग वैजापूर व गंगापूर मधील ३७, उपविभाग कन्नड खुलताबाद मधील १५३, उपविभाग सिल्लोड व सोयगाव मधील १२ असे एकूण ३८९ अर्जांचा समावेश आहे.

प्राप्त ३८९ अर्जांपैकी समितीअंतर्गत २७०, तर गॅझेटअंतर्गत २५५ अर्ज आहेत. काही प्रस्तावांची ऑनलाइन प्रक्रिया बाकी असून, उर्वरित प्रकरणांवर तालुकास्तरीय वंशावळ समितीच्या बैठकीत निर्णय झाल्यानंतर तातडीने पुढील कार्यवाही करून अर्ज निकाली काढण्यात येणार असल्याचेही जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी कळविले आहे.

# कुणबी जात प्रमाणपत्रासाठी विशेष शिबिरात जालना जिल्ह्यात आतापर्यंत १२६ अर्ज प्राप्त

जालना दि.११ (प्रतिनिधी)- कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी जात प्रमाणपत्र वितरणासाठी जिल्ह्यात मंडळस्तरावर १२ शिबिरे घेण्यात आली. या शिबिरांमध्ये आतापर्यंत एकूण १२६ अर्ज प्राप्त झाले असल्याची माहिती जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिली आहे.

तालुकानिहाय प्राप्त अर्जांमध्ये जालना तालुक्यातील दोन शिबिरांत १३, बदनापूरमधील एका शिबिरात १०, अंबडमधील एका शिबिरात २, घनसावंगीतील दोन शिबिरांत २०, भोकरदनमधील तीन शिबिरांत ५३, जाफराबादमधील एका शिबिरात १६, परतूरमधील एका शिबिरात ६ आणि मंठा तालुक्यातील एका शिबिरात ६ अर्जांचा समावेश आहे.

प्राप्त १२६ अर्जांपैकी समितीअंतर्गत ७८, तर गॅझेटअंतर्गत ४८ अर्ज आहेत. काही प्रस्तावांची ऑनलाइन प्रक्रिया बाकी असून, उर्वरित प्रकरणांवर तालुकास्तरीय वंशावळ समितीच्या बैठकीत निर्णय झाल्यानंतर तातडीने पुढील कार्यवाही करून अर्ज निकाली काढण्यात येणार असल्याचेही जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी कळविले आहे.

# विश्वबंधुत्व पंधरवाड्यात सहभागी होण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर दि.११ (प्रतिनिधी)- स्वामी विवेकानंद यांनी दि. ११ सप्टेंबर १८९३ रोजी अमेरिकेतील शिकागो येथे जागतिक धर्म संसदेत केलेल्या ऐतिहासिकभाषणातून जगाला दिलेला सर्वधर्मसमभाव, सहिष्णुता, मानवता,परस्पर सन्मान आणि विश्वबंधुत्वाचा संदेश समाजाच्या विविधघटकांपर्यंत व्यापक स्वरूपात पोहोचविण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र संशोधन,उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) यांच्या वतीने सन २०२६ पासून दरवर्षी ११ ते २६ सप्टेंबर दरम्यान 'विश्वबंधुत्व पंधरवडा' साजरा करण्यात येतो. यंदाही हा पंधरवडा साजरा होणार आहे. त्यात नागरिकांनी, संस्थांनी सहभागी व्हावे असे आवाहन अमृत संस्थेने केले आहे.

उपक्रमात सहभागी संस्थांनी आपल्या स्तरावर विविध स्पर्धा, चर्चासत्रे, व्याख्याने, जनजागृतीपरउपक्रम तसेच मूल्याधिष्ठित कार्यक्रम आयोजित करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. सहभागी संस्थांनी https://vbd.mahaamrut.org.in/ यापोर्टलवर ऑनलाइन नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी- विभागीय व जिल्हा कार्यालय - अमृत, पुंडलिक नगर रोड, सेक्टर- ४ सिडको, हनुमाननगर, पाण्याच्या टाकी जवळ, छत्रपती संभाजीनगर–४३१००९ येथे संपर्क साधावा. संपर्क क्रमांक-७३९१०६५४७५ / ९४०३२००६०६

# विशेष मतदार नोंदणी शिबीर; पात्र नागरिकांनी मतदार नोंदणीची संधी साधावी -जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी.

छत्रपती संभाजीनगर दि.११ (प्रतिनिधी)- विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम-२०२६ अंतर्गत जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रांवर दि. १९, २०, २६ व २७ सप्टेंबर रोजी विशेष मतदार नोंदणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. पात्र नागरिकांनी या शिबिरांचा लाभ घेऊन मतदार यादीत नाव नोंदणी तसेच आवश्यक दुरुस्ती करून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. गौडा यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत तयार करण्यात आलेली प्रारूप मतदार यादी दि. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. प्रारूप मतदार यादीवर दावे व हरकती दाखल करण्यासाठी दि. ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत मुदत आहे.

मतदार यादीत नाव समाविष्ट नसलेल्या पात्र नागरिकांना नवीन मतदार म्हणून नोंदणी करण्यासाठी नमुना-६ भरता येईल. मतदार यादीतील नोंदीमध्ये दुरुस्ती, स्थलांतर अथवा अन्य आवश्यक बदलांसाठी नमुना-८, तर अपात्र, मृत, दुबार अथवा अन्य कारणांमुळे नाव वगळण्यासाठी नमुना-७ द्वारे अर्ज करता येईल.

दि. १ ऑक्टोबर २०२६ रोजी १८ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वय पूर्ण करणाऱ्या आणि मतदार यादीत नाव समाविष्ट नसलेल्या पात्र नागरिकांनी मतदार नोंदणी करून घ्यावी. विशेषतः १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या नवमतदारांनी या मोहिमेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे.

जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रांवर दि. १९, २०, २६ व २७ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत विशेष शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. या शिबिरांमध्ये मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत मतदार नोंदणी, दुरुस्ती तसेच नाव वगळण्यासंदर्भातील अर्ज स्वीकारण्यात येतील.

ज्या पात्र नागरिकांची नावे मतदार यादीत नाहीत अथवा ज्यांना मतदार यादीतील नोंदीमध्ये दुरुस्ती करावयाची आहे, त्यांनी संबंधित मतदान केंद्रावरील विशेष शिबिरास भेट देऊन विहित मुदतीत अर्ज सादर करावेत. कोणताही पात्र मतदार मतदार यादीत नाव नोंदविण्यापासून वंचित राहू नये, यासाठी नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी केले आहे.